# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे


| | | |
|---|---|---|
| मासिकाचे नाव | : | दिशा |
| कार्यकारी संपादक | : | श्री. मोहन पाठक |
| प्रकाशक | : | विद्या प्रसारक मंडळ |
| प्रकाशन वर्ष | : | २००३ |
| वर्ष | : | तिसरे |
| अंक | : | ४ |
| पृष्ठे | : | ३४ पृष्ठे |

## गणपत्रिका विद्या प्रसारक मंडळाच्या "ग्रंथालय" प्रकल्पांतर्गत निर्मिती

## गणपत्रिका निर्मिती वर्ष : २०१०

## गणपत्रिका क्रमांक : ६७

MAHMAR 19356/13/1/2000-TC



विद्या प्रसारक मंडळ
व्ही. पी. एम्.
# दिशा
वर्ष तिसरे / अंक ४ / मार्च २००३

## संपादकीय

### मानगुटीवरची पाच महाभुते

फेब्रुवारी महिन्याचा अठ्ठावीशी महिना व या महिन्याचे शेवटचे दिवस म्हणजे सामान्य, मध्यमवर्गीय माणसाच्या दृष्टीने भीतीदायक स्वप्नांचं पर्व ! काय काय महाग होणार आणि तुटपुंज्या मिळकतीत दिवस कसे ढकलणार या काळजीने झोप उडविणारे हे दिवस होय. झोप लागलीच तर स्वप्नातही गॅस महागला, खाद्य तेलांचे भाव वाढणार, पेट्रोल महागणार या मथळ्यांची भीतीदायक स्वप्ने एका मागोमाग एक पडतात. भीती अधिकच वाढते आणि झोप उडते.

अर्थात हे सगळे, अनाकलनीय आकड्यात प्रसिद्ध होणाऱ्या अर्थसंकल्प नामक 'पंचमहाभूतांपैकी' एका महाभुतावदल! या दिवसातले दुसरे महाभूत म्हणजे आयकर. आयकराची रक्कम पगारातून वळती झाल्याने पगारही होत नाही असे हे शेवटचे महिने. जे आयकर बुडवितात व तरीही 'लाइम लाइट' मध्ये रहातात त्यांच्या एका पैला ही धक्का लागत नाही,पण सामान्य नोकरदार माणूस मात्र भरडून निघतो. उत्पन्न न दाखवणारी जनताही या देशात मोठी आहे. क्रिकेट चे एवढे जबरदस्त व्यसन या देशाला आहे की क्रिकेट पटुंच्या बक्षिसांच्या रकमांवर (ज्या कोटींच्या घरात आहेत) अर्थमंत्रीच कर माफी जाहीर करतात. वास्तविक अशा रकमांवर अधिक कर आकारून त्या रकमेचा विनियोग विकास कार्यांसाठी व्हायला हवा. क्रिकेट पटू देशासाठी खेळतात (असे आपले मानायचे !) !

फेब्रुवारी मार्च महिन्यात पंचमहाभूतांपैकी परीक्षा नामक एक तिसरे भूत सर्व शक्तीनिशी कार्यरत असते. आजकाल शिकवले जाते ते फक्त परीक्षेत चांगल्या गुणांनी (?) उत्तीर्ण होण्यासाठीच. मग पुढे त्या विद्यार्थ्यांचे काय झाले याविषयी शिक्षकांनाही सुख दुःख नाही, अन् शिक्षकांबद्दल विद्यार्थ्यांना.

या दोन महिन्याखेरीज गेली अनेक वर्षे कार्यरत राहून आमचे अतोनात नुकसान करणारे चौथे महाभूत म्हणजे 'सार्वजनिक उदासीनता' कामात स्वतःला झोकून द्यायचे. कामातून मिळणाऱ्या समाधानासाठी काम करायचे. आपण ज्या संस्थेत काम करतो त्या संस्थेच्या विकासासाठी दिवसातला प्रत्येक क्षण वेचायचा या वृत्तीचा अभाव असे हे भूत आहे. कोणतेही काम हे माझे असो नसो, मी केले पाहिजे, माझ्या वरिष्ठाच्या (व्यक्ती नव्हे पद!) अपेक्षेनुसार काम केलेच पाहिजे असे कोणालाच वाटत नाही. त्यामुळे Least bothered अशी माणस पदोपदी भेटतात. उदासीन, कंटाळलेली, दिवस भरणारी ही माणसे पाहिली की आम्हाला दगडांची संख्या या देशात वाढल्यासारखे वाटते.

आणि पाचवे महाभूत म्हणजे मराठीत ज्याला 'इझी मनी' म्हणतात, ते काम न करता प्रचंड पैसा मिळवण्याचे स्वप्न ! स्वप्नाने आबाल वृद्ध झपाटलेले आहेत. भविष्यात इतिहासाचा अभ्यास करणाऱ्या पिढ्या आश्चर्य व्यक्त करतील अशी ही धनलालसा आहे. पैसा किती हवा याला प्रमाण नाही, पूर्ण विराम नाही. रक्त ओके पर्यंत म्हणजे पैसा पैसा करत जगतात त्यावेळेला ही माणसे म्हणजे नोटा छापणारी यंत्रे वाटतात.

थोडक्यात पंचमहाभूतांचा महिमा अगाध आहे ! या पंचमहाभूतांचा करिष्मा अगाध आहे !

व्ही. पी. एम्.

# दिशा

वर्ष तिसरे / अंक ४ / मार्च २००३

**कार्यकारी संपादक**
प्रा. मोहन पाठक

**कार्यालय**
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्यामंदिर
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२
दूरध्वनी : २५४२ ६२ ७०

**मुद्रण स्थळ :**
परफेक्ट प्रिन्ट्स,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
दूरध्वनी : २५३४ १२ ९१
२५४१ ३५ ४६

## अनुक्रमणिका

| | | | |
|---|---|---|---|
| १) | मकर संक्रांत | श्री. शंकर वा. मठ | ३ |
| २) | श्रीमद्‌भगवत् गीता (अध्याय १२ वा) ॥ सगुण भक्ति योग: ॥ | श्रीमती आशा भिडे | ७ |
| ३) | रात्रशाळेच्या दृष्टिकोनातून नवीन अभ्यासक्रम कसा असावा ? | श्री. प्रभाकर द. अरदकर | १३ |
| ४) | पर्यटन व्यवसाय: नवे क्षितिज ! | गीतेश शिंदे | १५ |
| ५) | मराठीसाहित्यातील 'शांता -दुर्गा' | वैशाली प्रकाश बवाणी | १८ |
| ६) | ग्रंथालय चळवळ आणि पालघर तालुक्यातील वाचन संस्कृती | श्री. अशोक ठाकूर | २२ |
| ७) | 'झालाच पाहिजे!' आचार्य अत्रे यांचे घणाघाती लेख | प्रा. मोहन पाठक | २५ |
| १०) | परिसर वार्ता | प्रा. मोहन पाठक | २८ |

या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# मकर संक्रान्त

*जानेवारीच्या अंकासाठी म्हणून , पण अंकाची तयारी झाल्यानंतर हाती आलेला हा लेख. मार्च महिन्यत लेख आला तरी विषय म्हणून त्यातून मिळणारी माहिती वाचकांच्या दृष्टीने महत्वाचीच आहे. त्यामुळे हा लेख मार्चमध्ये घेत आहोत. - संपादक*

**भारतात ज्योतिर्विज्ञान :-**

वेद कालापासूनच भारतात ज्योतिर्विज्ञान ज्ञान अवगत आहे. वैदिक युगारंभाच्या सुरुवातीपासूनच वर्ष, बारा चांद्रमास, प्रत्येक तिसऱ्या वर्षी अधिकमास या सर्वांची संकल्पना आढळते. ऋग्वेदात या बद्दल स्पष्ट उल्लेख आढळतो. 'वेद मास धृत व्रतो द्वादश: प्रजावत: । वेद त उपजायते ।' प्रजापालन करण्याचे ज्याचे व्रत आहे, अशा वरुणाला बारा महिने व एक जास्तीचा (अधिक मास) याची जाणीव होती. तैत्तिरिय संहितेत खालीलप्रमाणे उल्लेख आहे. दोन महिन्यांचा त्या काळी ऋतु गणला जात असे. मधु व माधव - वसंत ऋतु, शुक्र व शुचि-ग्रीष्म ऋतु, नभ व नभस्य वर्षा ऋतु इष व ऊर्ज शरद ऋतु सह व सहस्य हेमन्त ऋतु, तप व तपस्य शिशिर ऋतु. वेद काळी महिन्याची नावे वरील प्रमाणे होती. सूर्याची उत्तरायण व दक्षिणायन या गति निश्चित होत्या. सत्तावीस नक्षत्रांचा उल्लेख वैदिक सूक्तातून आढळतो. सूर्य उगवत नाही वा अस्तही पावत नाही याची सम्यक् कल्पना वैदिक काळी होती. ऐतरेय ब्राह्मणात सांगितल्याप्रमाणे सूर्य अस्त पावतो असे जे म्हटले जाते तो दिवसच असतो तो शेवटाला जाऊन पुन: परततो. तो दिवसच करतो व रात्र मागे सारतो. तो सकाळी उगवतो असे म्हटले जाते. सूर्य रात्रीच्या शेवटाला जाऊन पुन: परततो व दिवसच आमच्यासाठी करतो व रात्र दूर सारतो. पृथ्वीच्या परिभ्रमणामुळे सूर्योदय व सूर्यास्त जाणवतो.

पुढील काळात ज्योतिर्विज्ञानाचा पहिला आचार्य आर्यभट्ट होय. त्यांनी आपल्या वयाच्या अवघ्या तेवीसाव्या वर्षी 'आर्यभटीय' नावाचा ग्रंथ लिहिला. आर्यभटांनी तत्कालिन पौर्वात्य व पाश्चमात्य ज्योतिर्विद विद्वान लोकांच्या पद्धती समजून घेतल्या व आपल्या प्रतिभेने त्यांनी सर्व संग्राहक असा ग्रंथ लिहिला. यामुळे त्यांची संशोधन वृत्ती व लिखाणाची शैली याला बहुमान प्राप्त झाला. सर्व प्रथम आर्यभटानीच असे प्रतिपादन केले की पृथ्वी आपल्या आसाभोवती अक्षरेखेनुसार भ्रमण करते. राशी, कला, अंश यांचा संबंध आकाशाच्या कक्षेचा विस्तार, पृथ्वी, सूर्य, चंद्र याची भ्रमणगति, पृथ्वीचा व्यास, ग्रहांची क्रांती त्यांच्या आवाका या सर्वांबद्दल आर्यभटीयात त्यांनी उल्लेख केले आहेत.

**संक्रमण काल :-**

अंतरिक्ष बारा राशीत व तसेच सत्तावीस नक्षत्र यात गती ध्यानात येण्याच्या सोयीसाठी विभागले गेले आहे. बारा महिन्याच्या समूहाला संवत्सर असे नाव आहे. सूर्याला बारा राशीतून भ्रमण करण्यासाठी जो कालावधी लागतो त्यालाच संवत्सर असे म्हणतात. सूर्य राश्यन्तर करतो म्हणजेच संक्रान्ति होते असे मानले जाते. सूर्याच्या भोवती पृथ्वीचे भ्रमण होत असल्याने ऋतु व अयने या निर्माण होतात. संक्रांतीचा तिसावा भाग म्हणजे एक दिवस होय ! अर्ध्या संक्रांतीचा काळ म्हणजे अर्धा महिना (एक पक्ष) व पूर्ण संक्रांतीचा काल हा एक महिना होतो. दोन संक्रातिकाल म्हणजे एक ऋतु. सहा संक्राती काल म्हणजे अयन व बारा संक्रांतीसाठी लागणारा कालावधी म्हणजे एक संवत्सर (वर्ष) होय. ज्या महिन्यात सूर्याचे संक्रमण होत नाही त्या चांद्रमासाला अधिक मास असे म्हणतात. त्यालाच मळमास असेही नाव आहे.

**मकर संक्रात :-**

सूर्यांचा प्रत्येक राश्यांतर कालाला संक्रान्ती असे म्हटले जाते तरी अयन संक्रमण काल हा विशेष मानला जातो. आदित्य सहा महिने दक्षिणेकडे सरकतो व सहा महिने उत्तरेकडे. मकर संक्रान्ती ही केवळ 'राशिसंक्रान्ती' नसून 'अयन संक्रान्ती' आहे. उत्तरायणात आदित्य उत्तर गोलार्धात अत्यंत रमणीय काल घडवितो. काही विद्वानांच्या मते प्राचीन काळी आपल्या पूर्वजांची वस्ती उत्तर ध्रुवाजवळ असावी. तेथील भौगोलिक परिस्थिती काही औरच असते. तेथे उषेचे अत्यंत रमणीय दर्शन होत व प्रसन्नता प्राप्त होते. या बद्दलचे वर्णन ऋग्वेदात फार बहारीचे आहे. तेथे सहा महिने रात्र म्हणजे अंधुक प्रकाश देखील नसलेला काळ असतो. या कालावधीत सूर्याचे दर्शनही होत नाही. सहा महिन्यानंतर सूर्य उत्तर गोलार्धाकडे सरकू लागला म्हणजे मकर राशीत प्रविष्ट होतो व त्यानंतर उत्तरेकडे प्रकाशाची पहाट होते. या दीर्घ काळानंतर सूर्य प्रकाश होत असल्याने तो प्रकाश पाहताच तेथील लोक आनंदातिशयाने पुलकित होतात. उत्साहाने भारले जाऊन एक उत्सव साजरा करतात. यात काहीच वावगे नाही. हा मनुष्य स्वभावच आहे. प्रकाश पाहण्याच्या आनंदाने ते हरखून जातात व आनंदाचा जल्लोष करतात. मकर संक्रान्तीच्या उत्सवाचे हे मूळ कारण होय. तेव्हापासून हा उत्सव साजरा करण्याची प्रथा पडली.

**आंग्ल पद्धती :-**

आंग्ल काल गणनानुसारेण डिसेंबर महिन्याच्या बावीस तारखेला उत्तरायण संक्रमणाचा आरंभ होतो. मात्र भारतात प्रत्यक्ष मकर संक्रान्त दोन वा तीन आठवड्यानी म्हणजे जानेवारी १४ तारखेला होतो. या दोन्ही कालावधीतील फरकाची दोन कारणे संभवतात. जरी डिसेंबर बावीस तारखेला उत्तरायणाचा आरंभ होत असला तरी उत्तर ध्रुव प्रदेशात सूर्य दिसावयास मधे जो कालावधी लागतो तो ध्यानात घेतल्यास जानेवारी १४ तारखेपर्यंत तेथे सूर्य दर्शन होऊ लागते. धनराशीतून सूर्य मकर राशीत तेव्हा प्रविष्ट होतो. त्या दिवसाला संक्रान्त ही मानली जाते. दुसरी गोष्ट अशी हजारो वर्षापूर्वी याचा विचार झालेला आहे. संपात बिंदूच्या स्थित्यंतरामुळे हा मधला काळ कमी जास्त होऊ शकतो. दोन वर्षांपूर्वी मकर संक्रान्त जानेवारी पंधरा तारखेला होती. स्वामी विवेकानंद यांचा जन्म बारा जानेवारी १८३६ ला झाला त्या दिवशी मकर संक्रान्त होती. याप्रमाणे प्रत्यक्ष सूर्याचा मकर राशीत प्रवेश तोच संक्रात काळ मानला जातो.

**केव्हा संक्रान्त होत नाही :-**

ज्यावेळी सूर्य चांद्रमासात मेष राशीत असतो तेव्हा चैत्रमास होतो. जेव्हा तो वृषभ राशीत जातो तेव्हा वैशाख मास होतो. येणेप्रमाणे प्रत्येक महिन्यातील राश्यन्तराने ते ते महिने होतात. एखादेवेळी एखाद्या चांद्रमासात सूर्याचे राश्यान्तर घडत नाही त्यावेळी त्या महिन्याला अधिक महिना असे म्हणतात. सूर्याच्या राश्यान्तरानेच संक्रात होत असते. इथे अधिक मास होण्याचे कारण चंद्र व सूर्याची गति भिन्न असल्याने सौर गणनेशी चांद्रमास जुळवून घ्यावे लागतात. दरवर्षी चंद्र संवत्सर व सौर संवत्सर यात अकरा दिवस फरक पडतो. दर तीन वर्षांनी एक अधिक मास झाल्याने हा फरक जुळवून घेतला जातो. हे करत असताना एखाद्या चांद्रमासात दोनदा सूर्याचे राश्यन्तर संभवते तेव्हा क्षयमास संभवतो. दोनदा राश्यन्तर एका चांद्रमासात घडल्यास तो क्षयमास होतो हे क्वचितच संभवते. सूर्य व चंद्र यांच्या भ्रमण गति नुसार चांद्रमास व सौरमास यातील फरक अशा रीतीने नाहीसा केला जातो ही संक्रान्त मीमांसा

**मकर संक्रान्तीची वैशिष्ट्ये :-**

मकर संक्रमण काळ हा पुण्य काळ असा मानला जातो. गीतेत अयन काळ संबंधीचे वैशिष्ट्य वर्णिले आहे. अग्निर्ज्योतिरहः शुक्लः षण्मासा उत्तरायण । तत्र प्रयाता गच्छन्ति ब्रह्म ब्रह्मविदो जनाः । धूमो रात्रिः तथा कृष्णं षण्मासा दक्षिणायनं । तत्र चांद्रमसं ज्योतिः योगी प्राप्य निवर्तते । शुक्ल कृष्णे गती होते जगतः शाश्वते मते । एकया

याति अनावृत्ति अन्यया आवर्तते पुन: ।गी ८ - २४, २५, २६

अर्थ - अग्नि, ज्योति (ज्वाला) दिवस शुक्ल पक्ष उत्तरायणाचे सहा महिने या काळात मृत्यु पावलेले ब्रह्मवेत्ते ब्रह्मपदाला जातात - २४

धूर (धुमसणारा अग्नी) रात्र तसेच कृष्ण पक्ष, दक्षिणायनाचे सहा महिने होत या काळी मरण पावलेले योगी चंद्रलोकात जाऊन परत मृत्युलोकात जन्माला येतात. २५

हे शुक्ल व कृष्ण म्हणजे प्रकाशमय व अंधकारमय असे प्राणिमात्राचे परलोकचे दोन मार्ग कायमचे मानले गेले आहेत. यातील एका मार्गाने मनुष्य प्राणी पुनः जन्मरहित स्थितीला जातो व दुसऱ्या मार्गाने गेलेला पुन: जन्म मरणाच्या फेऱ्यात सापडतो. २६

पुन: भूलोकी येऊ नये असे वाटत असलेले उत्तरायणातच त्यांचे प्रयाण इच्छितात अन्यथा जन्ममरण फेरा चुकत नाही आणि म्हणूनच शर पंजरी पडलेले भीष्म पितामह उत्तरायणाची वाट पाहात होते. उत्तरायणातच त्यांचे प्राणोत्क्रमण झाले.

मानवाचा एक संवत्सर काळ उत्तर ध्रुवावर एक अहोरात्र संभवतो. म्हणून तो देवतांचा एक दिवस मानला जातो. उत्तरायण हा देव मार्ग यासाठी म्हटले जाते. जेव्हा सूर्य कर्क राशीत प्रविष्ट होतो तेव्हा दक्षिणायनाला प्रारंभ होतो व त्याच्या मकर राशी प्रवेशाने उत्तरायण होतो. या अयनांची गती या भूतलावर शाश्वत मानल्या जातात. यालाच दक्षिणायन - पितृयान व उत्तरायण - देवयान अशी संज्ञा दिली आहे. या संबंधी शतपथ ब्राह्मणात सविस्तर वर्णन आढळते.

उद्गयने प्रमीयते देवांना एष महिमानं गत्वा आदित्यस्य सायुज्यं गच्छति अथ योदक्षिणे प्रमीयते पिृणां एव महिमानं गत्वा चंद्रमसे: सायुज्यं सलोकमां आप्नोति एनौ वै सूर्य चन्द्रमसो: महिमानं । उत्तरायणात प्रयाण केले असता देवयान (मार्ग) प्राप्त झाल्याने सूर्यलोकात सूर्याशी एकरूप होता येते तसेच दक्षिणायणात प्रयाण झाले असता पितृयानाने चंद्रलोकी जाऊन चंद्राशी सायुज्यता प्राप्त होते अशी या चंद्र सूर्य मार्गांचा महिमा आहे.

उत्तरायणात शुभ कार्ये केली जातात. विशेषत: गृह प्रवेश, विवाह, चौल, व्रतबंध इत्यादि. थोडक्यात उत्तरायणात शुभ कार्ये करावीत व इतर कर्मे दक्षिणायनात केलेली चालतात. यद्यपि मार्गशिर्ष हा महिना दक्षिणातला असला तरी विवाहादी शुभ कार्याला तो चांगला असल्याचे सांगितले जाते.



**धार्मिक विधी :-**

मकर संक्रमणाला पर्व काळ असे म्हटले जाते. बहुतेक लोक पर्वकाळात गंगेत वा जलाशयात, मोठाल्या सरोवरात पवित्र स्नान करतात. दक्षिणा, दान, इत्यादी पाप क्षालनासाठी देतात. संक्रान्ति ही एक देवता असून ती सूर्य गतीबरोबरच उत्पन्न होते. तिची सात नावे आहेत. मन्दा, मन्दाकिनी, ध्वांक्षी, घोरा, महोदरी, राक्षसी व मिश्रिता. ती देवी ज्या दिशेकडे जाते व हातात वस्तु धारण करते ती दिशा अवर्षणाने ग्रस्त होते वा रोग ग्रस्त होते तसेच तिने धारण केलेल्या वस्तू दुर्मिळ होतात, असे तिचे वर्णन आढळते म्हणून लोक पुण्य कर्माने तिला प्रसन्न करू पाहतात.

**अन्यान्य ठिकाणी साजरा होणारा उत्सव :-**

या विशाल भारत देशात निरनिराळ्या ठिकाणी विविध पद्धतीने लोक उत्सव साजरे करत असतात. महाराष्ट्रातील लोक देवीची पूजा करतात. सौभाग्यवती स्त्री सुगडामध्ये वस्तू घालून ती देते. तिला गुळाचे मिश्रण करून सर्वांना अत्यंत नम्रपणे देण्यात येते व 'तिळगूळ घ्या गोड



गोड बोला' असे एकमेकाशी बोलले जाते. पंजाबात तीन दिवस मकर संक्रान्ति उत्सव साजरा करतात. त्याकाळी कोणत्यातरी पवित्र नदीत, जलाशयात तीर्थात स्नान करणे, महात्मे वा पुण्यवंताच्या स्थानाना भेटी देणे, तसेच गुरु गोविंद सिंह यांच्या स्थानाचे दर्शन घेणे, असे कार्यक्रम विशेष करून केले जातात. बंगालात हजारो स्त्री-पुरुष पवित्र गंगेत स्नान करतात. गंगा स्नान अतीव पुण्यकारक व पवित्र असे मानले जाते. दक्षिण भारतात 'पॉंगल' म्हणून उत्सव साजरा केला जातो. हाही उत्सव तीन दिवस पर्यंत चालतो. देवीची पूजा, पवित्र स्नान इत्यादी धार्मिक कृत्ये केली जातात. मकर संक्रान्तीच्या दिवशी अग्नी प्रदीप्त करून त्यावर दुधाचे भांडे ठेवण्यात येते. सभोवताली मंडळी उभी राहतात. काही वेळाने दूध तापते व भांड्यातून उतू जाऊ लागते. ज्या दिशेला भांड्यातून दूध उतु जाते हे पाहून शुभ वा अशुभ विचार प्रकट केले जातात. अशा प्रकारे संपूर्ण भारतात विविध प्रकाराने मकर संक्रान्तीचा उत्सव अत्यंत उत्साहाने साजरा केला जातो.



**हा एक सामाजिक उत्सव आहे :-**

अलीकडे संक्रान्ती हा उत्सव सार्वजनिक स्वरूपात साजरा केला जात असतो. या दिवशी गोड व स्निग्ध पदार्थांचे वाटप केले जाते. तीळ हा पदार्थ तैल युक्त आहे. संस्कृतात स्निग्ध पदार्थाला स्नेह म्हणतात व गुळात गोडी आहे. एकमेकांचे व्यवहार संबंध स्नेहपूर्ण (प्रेमपूर्ण) व गोडीने व्हावेत याचे प्रतीक म्हणून तीळ व गुळ मिश्रित पदार्थ एकमेकांना दिले जातात. अबाल वृद्ध, स्त्री-पुरुष व लहान-थोर सगळेच यात सहभागी होत असतात. काही सौभाग्यवती स्त्रिया वैयक्तिकरित्या हळदीकुंकवाचा कार्यक्रम करून काही वस्तू प्रदान करतात. याला लुटणे असे नाव आहे. यमधर्माने तपश्चर्या करून तीळाची निर्मिती केली असे म्हटले जाते. म्हणून पितरांचे तर्पण तीळ व पाण्याने केले जाते. तीळ दान केले असता वंशवृद्धी होते, संततीचे आरोग्य वृद्धिंगत होते. तीळाचे महात्म्यही वर्णिले आहे. तिळ स्नायी, तिलोद्वर्ती, तिळहोमी तिलोदकी । तिळभुक्ती च दाता च षट् तिळा पापनाशका: । अंगाला तिळेय लावून स्नान करणे, तीळाच्या चीकाने अंग लेपन करणे, तीळ द्रव्याने होम (हवन) करणे, तीळ वाटून पाण्यात कालवून स्नान करणे अगर पितराना तीलोदक (तीळ व पाणी) देणे तीळ खाणे व तीळाचे दान करणे हे सहा प्रकार पुण्यकारक आहेत. (पाप नाशक आहेत.)

संक्रान्तीचा उत्सव परस्परात प्रेमभाव वृद्धिंगत करणारा सामंजस्य, सहयोग, सहकार्य वाढविणारा असा आहे. यासाठी अनेक मंडळींना एकत्र करून हा उत्सव केला जातो.

उत्तरायण काळात नम (अंधकार) अलय होतो व दिवसेंदिवस प्रकाश वाढत जातो. अज्ञानरूपी अंधार कमी करून ज्ञानाचा प्रकाश याचा स्वीकार करावा, असा या मकर संक्रमणाचा संदेश आहे. एकमेकांशी प्रेमभावनेने व्यवहार करून सुखी समाधानी जीवन जगणे हा मकर संक्रमणाचा आदेश आहे. अंधार नको प्रकाशाकडे जा असे उपनिषदे आपल्याला सांगतात. त्याचा योग्य विचार व्हावा । तमसो मा ज्योतिर्गमय । आपण प्रकाशाचे म्हणजे ज्ञानाचे पुजारी बनावे अज्ञान आपोआप दूर होईल, यासाठी संक्रमण उत्सव.

**श्री. शं. बा. मठ**
६, आशिष, राम मारुति रोड,
ठाणे - ४०० ६०२.

•••

# श्रीमद्‌भगवत् गीता (अध्याय १२ वा) ।। सगुण भक्ति योगः ।।

(सर्व घराघरांसाठी घरातील सर्वांसाठी 'श्रीमद्‌भगवत् गीता' सर्वांना सहज समजेल अशी)

श्रीमती भिडे यांचा गीतेवरील लेखमालेतील हा १२ व्या अध्यायावरील लेख. - संपादक

बाराव्या अध्यायाच्या सुरुवातीला अर्जुनाने जो प्रश्न विचारला आहे त्याचा संबंध अकराव्या अध्यायातील ४७, ४८, ५२, ५३, ५४ या शेवटच्या श्लोकांशी आहे. त्यामुळे प्रथम त्याचा अर्थ पाहणे योग्य होईल. ४७ व ४८ व्या श्लोकात भगवंत म्हणतात, 'अर्जुना, माझे हे परम श्रेष्ठ तेजोमय, विराट, असीम व अपूर्व असे विश्वरूप, जे देवांनाही दुर्मिळ ते विश्वरूप दर्शन वेदांनी, यज्ञांनी, स्वाध्यायांनी, दानांनी, कर्मांनी, उग्र त्यांना मृत्यूलोकी तुझ्याखेरीज कोणालाही शक्य नाही. पूर्वीही हे रूप तुजवाचून इतरांनी कधीही पाहिलेले नाही. ५२ व ५३ मधेही हाच आशय आहे. पण ५४ व्या श्लोकात मात्र भगवंत म्हणतात की हे अर्जुना, केवळ अनन्य भक्तीनेच या प्रकारे मला यथार्थपणे जाणणे, पाहणे व माझ्या ठायी प्रवेश करणे म्हणजेच मद्रूप होणे शक्य आहे. ५५ व्या श्लोकात हा अनन्य भक्त कसा असतो त्याचेही वर्णन भगवंताने सांगितले आहे.

या भगवंताच्या बोलण्यामुळे गांगरलेला, गोंधळलेला अर्जुन १२व्या अध्यायाच्या सुरुवातीलाच प्रश्न करतो की, 'हे भगवंता, तुझ्या अक्षर, अव्यक्त स्वरुपाची उपासना' करणारा श्रेष्ठ? की तुझ्या सगुण साकाराची भक्ती करणारा श्रेष्ठ? हे एकदा नीट मला सांग म्हणजे त्याप्रमाणे आचरण करता येईल. म्हणजे इंद्रियांनी तुझी सगुण भक्ती करणारा श्रेष्ठ? की मनाने तुझ्या निर्गुण निराकार स्वरुपाची उपासना करणारा श्रेष्ठ ?



या प्रश्नाने भगवंतही क्षणभर विचारात पडतात. दोन्ही मलाच प्राप्त होतात. आईला जशी दोन्ही मुलं सारखीच मोठा समंजस लहानगा आईच्या कडेवर चिकटून बसणारा. दोघेही मला सारखेच लाडके. पण सगुण भक्ती जास्त सुलभ. देहधारी मानवासाठी. अव्यक्ताची उपासना दोन मार्गांनी करता येते. १) योग मार्ग २) विज्ञान मार्ग दोन्ही द्वारा निखळ सत्याचे संशोधन. दोन्ही मार्ग क्लेशाचे प्रदीर्घ प्रवास मार्ग.

जडता रहित शुद्ध चैतन्य स्वरुप उग्र व संहारक. परम सत्य- परब्रह्म - सहस्र सूर्य एकाच वेळी प्रगट व्हावेत असे दैदिप्यमान तेज. ज्ञानेश्वर महाराज त्यालाच चितसूर्य, स्वरुप प्रलय, प्रकाशाचा-तेजाचा सागर म्हणतात. हे दिव्य दर्शन दाहक, ते एखाद वेळी जीवन संपवील. म्हणून ही अव्यक्ताची उपासना क्लेशकारक, असह्य, उग्र भीतीदायक. मनाच्या आत आधाराशिवाय खोल खोल उतरणं व परब्रह्मात विलीन होणं हा योग मार्ग व संशोधनाचा मार्ग म्हणजे वातावरणाचे पापुद्रे दूर करत आकाशात झेप घेणं. परमाणू स्फोट घडवून सारी पृथ्वी सूर्यात रुपांतरित होईल नुसता आगीचा गोळा मग जीवसृष्टी नष्ट.

म्हणून भगवंत म्हणतात, 'देहधारी मानवाला सगुण भक्तीच जास्त सुलभ आहे. पाचव्या अध्यायात ही कर्म विकर्मांच्या सहाय्याने मनुष्य अकर्म भूमिकेवर येतो. अकर्म दशा दोन रूपांनी प्रगट होते.

अकर्म

| रात्रंदिवस कर्मे करूनही लेशमात्र कर्म करीत नाही सगुण भक्त | एकही कर्म न करता सर्व विश्वाची उलाढाल करणारा (सूर्य-चंद्र) निर्गुण भक्त |
|---|---|

बाहेरून निराळे

आतून एकरूपच

पाचव्यात हेच उत्तर तेच पुन्हा वर अध्यायात आले आहे. आता भगवंतानी हे तर एकदा सांगितलेच, इंद्रिय दमन करून निर्गुण निराकार अव्यक्त ब्रह्माची उपासना करणे देहधारी मानवाला कष्टाची व प्रदीर्घ काळ लागणारी साधना आहे तेव्हा तू सगुणाची सुलभ पद्धतच स्वीकार असे ते पुन्हा अर्जुनाला सांगतात. आता ही सगुण भक्ती कशी कर तेही ते त्याला समजावून सांगतात.

- माझ्या ठिकाणी चित्त स्थिर ठेव. पण हे तुला शक्य नसेल तर
- अभ्यास योगाने म्हणजे पुन: पुन्हा प्रयत्नाने मला प्राप्त कर.
- पण अभ्यास करण्यासही असमर्थ असशील तर
- सर्व कर्मे माझ्यासाठी कर. मत्प्रीत्यर्थ कर. म्हणजे तू मला पावशील बरं का अर्जुना.
- हे ही जास्त जमत नसेल तर सर्व फलाचा त्याग कर.
- तुला सांगतो अर्जुना. अभ्यासाहून ज्ञान श्रेष्ठ

  ज्ञानाहून ध्यान श्रेष्ठ
- ध्यानाहून कर्मफल त्याग श्रेष्ठ त्यापासून त्वरीत शांती प्राप्त होते.

आता हा सगुण भक्त कसा असावा तुला सांगतो -

द्वेष न करणारा, मैत्री ठेवणारा, निरहंकारी, निरपेक्ष, ममत्व बुद्धी, स्थितप्रज्ञ, सुख दु:ख सम मानणारा, क्षमाशील, संतुष्ट, समाधानी, संयमी, दयाळू, दृढनिश्चयी, कर्तव्य कर्मे निरपेक्ष बुद्धीने करणारा, जागरुक, आंतर्बाह्य पवित्र, क्रोधावर विजय मिळवलेला, वासना जिंकलेला, परोपकारी, निरीच्छ, निर्द्वंद्वी, समबुद्धी निर्भय, मदर्थ कर्मे करणारा, कोणाशी वैर नसलेला असा जो माझा भक्त तो मला प्रिय होतो बरं पार्था.

विश्वरूप दर्शनाने घाबरलेला अर्जुन त्याला पुन्हा सगुण रुपात ये अशी विनवणी करतो. मला तू सगुण, साकार रुपातच आवडतोस म्हणतो. तेव्हा भगवंत त्याला म्हणतात, 'तू अंगाला सोडून छायेला आलिंगन देतो आहेस. ठीक आहे तरी तू आता असे कर, घार कशी आकाशात विहार करते पण तिचे लक्ष खाली पिल्लांपाशी असते तसे तू स्वरूपाच्या ठायीचित्त ठेवून विहित कर्मे कर. अरे कृपण मनुष्य नाही का शरिराने सर्वकडे फिरतो पण त्याचे मन त्या धनावर असते.

म्हणजे निर्गुणाच्या ठायी लक्ष असू दे. त्याची उपासना कर असेही सांगतो नि दुसऱ्या बाजुने अनन्य भक्तीचे महात्म्यही सांगतो. या परमेश्वराच्या धोरणामुळेच अर्जुनाला संभ्रम निर्माण होतो व सुरवातीलाच तो प्रश्न करतो.

भगवंत म्हणतात, निर्गुणाच्या अभावी सगुणही सदोष होतो. निर्गुणाची मर्यादा सगुणाला समतोल ठेवते. विनोबाजी एक उदाहरण सांगतात. निरनिराळी कार्य करण्यासाठी एखादी संस्था स्थापन होते. संस्थापक एखादी व्यक्ती असते. ती व्यक्ती संस्थेचा मुख्य आधार. संस्था प्रथम व्यक्तीनिष्ठ. पण संस्थेचा विकास होण्यासाठी ती हळूहळू तत्वनिष्ठ झाली पाहिजे. नाहीतर ती स्फूर्ती देवता गेली की संस्थेत अंधार अनागोंदी माजेल. (ठाणे जिल्हा प्रमुख आनंद दिघे यांच्या निधनाने सध्या शिवसेनेत हीच परिस्थिती निर्माण झालीय.) असे व्हायला नको. व्यक्तीपेक्षा समष्टीला

महत्त्व द्यायला हवे हे भगवंतानी पहिल्या अध्यायापासून कानी कपाळी प्रेमाने क्रोधाने पुन्हा पुन्हा सांगितले आहे. माणसाचा 'मी' गेला आणि तिथे विश्वबंधुत्व, विश्वकल्याण ही वृत्ती निर्माण झाली तर काय पाहिजे आणखी? मग सर्वच प्रश्न आपोआप सुटतील. व्यक्तीतून तत्वनिष्ठा उत्पन्न झाली पाहिजे. तर असे होणार नाही. संस्था टिकून राहील. व्यक्ती म्हणजे सगुण, संस्था ही निर्गुण. सगुणाला निर्गुणाची मदत पाहिजे. केव्हातरी मूर्तीतून आकारातून बाहेर आले पाहिजे. कमान बांधताना आधार देतात. ती पूर्ण झाल्यावर आधार काढून घेतात. नव्याने चालू लागणाऱ्या मुलाला पांगुळगाडा देतात. नंतर ते सुटे चालू लागणाऱ्या मुलाचा पांगुळगाडा काढून घेतात. आधार काढल्यावर कमान टिकली तर तो आधार खरा होता. स्फूर्तीचा झरा सगुणातून (म्हणजेच भक्तीचा झरा प्रथम सगुणातून) निर्माण झाला. तरी शेवटी परिपूर्णता तत्वनिष्ठेत निर्गुणात झाली पाहिजे. भक्तीच्या पोटातून ज्ञान निर्माण झाले पाहिजे. विनोबाजी म्हणतात, भक्तीच्या वेलीला ज्ञानाची फुले लागली पाहिजेत. स्फूर्तीचा झरा सगुणातून निर्माण झाला तरी तो निर्गुणाच्या सागरास मिळाला पाहिजे.

सगुणाला निर्गुणात जावे लागते } एकमेकांनी एकमेकांना
निर्गुणाला सगुण व्हावे लागते } परिपूर्णता येते.

निर्गुण सगुण परस्पर पुरक आहेत. सगुणाला निर्गुणाचा आधार हवा निर्गुणाला सगुणाचा ओलावा. 'ज्ञानाविना कर्म आंधळं असतं तर कर्माविना ज्ञान पागळं', हे सत्य आहे.

रामाविषयी भरत भक्ती हे निर्गुणाचे उदाहरण तर लक्ष्मण भक्ती हे सगुण भक्तीचे उदाहरण. लक्ष्मणाने प्रत्यक्ष सेवा केली तर भरताने दूर राहून भक्ती केली.

निर्गुणात सगुण ठासून भरलेले आहे. हे विश्वच निर्गुणातील सगुण आहे. विश्व हे निर्गुणाचा सगुण वामनावतार आहे. सगुण पुढे पण त्याच्या मागून निर्गुण आलेच पाहिजे. निर्गुणात सगुण गुप्त असते. सगुणात निर्गुण गुप्त असते.

| | सगुण भक्ती | निर्गुण भक्ती (उपासना) |
|---|---|---|
| १) | प्रत्यक्ष इंद्रियांनी भक्ती करणे, मूर्तीपूजा | मन व बुद्धी द्वारा ब्रह्माची अहोरात्र उपासना मनात ध्यान चिंतन करणे |
| २) | कर्मदशा | संन्यास योग, समबुद्धी |
| ३) | सुलभ साधना | क्लेशकारी, प्रदीर्घ |
| ४) | इंद्रियांना ईश्वरार्पण करतो | इंद्रिय दमन अतिंद्रिय, सूक्ष्म |
| ५) | प्रेममय, भावनामय | ज्ञानमय, भयावह |
| ६) | ओलावा, सुरक्षितता | भय, धोका |
| ७) | स्थूल, जडतेशी संबंध | स्थूल, जडाचा लोप |
| ८) | माया, प्रकृती | पुरुष, परब्रह्म |
| ९) | क्षर, व्यक्त | अक्षर, अव्यक्त |
| १०) | स्मित आनंदायक एकरुपता समर्पणाची भावना | विराट दु:खानेच सद्गती 'स्व'चा विलय |

गीता - नि:संगता अनासक्ती हे तिचे ध्रुपद पालुपद. भगवान सांगतात, अर्जुना तू सगुण ऐस किंवा निर्गुण ऐस भक्त ऐस म्हणजे झाले. गोटा राहू नकोस. माझी आसक्ती ठेव. म्हणजेच निर्गुण निराकार परमात्म शक्तीची, चैतन्याची आसक्ती ठेव. विश्वरूप दर्शनानंतर अर्जुनाला भगवंताचे चैतन्यरूप ज्ञात झालेले होते. समोर दिसतो तेवढाच तो सगुण साकार नाही तर निर्गुण निराकार परब्रह्मच सगुण साकार होऊन आपल्यापुढे उभे आहे, याची कल्पना अर्जुनाला आलीच होती म्हणून भगवंत त्याला 'माझी आसक्ती ठेव' म्हणतात.

ब्रह्माचे विराट दर्शन म्हणजे निर्गुणरूप, यात प्रकृतीचा, स्थूलाचा लोप, प्रकाशाचा, चैतन्याचा सागर, दृश्य सृष्टिच्या पलिकडले, जन्म मृत्यू न पावणारे अढळ, नित्य, ध्रुव, अचल, सृष्टिप्रमाणे अखंड परिवर्तन न पावणारे सृष्टित व्यापून राहिलेले, अतिसूक्ष्म म्हणून अणुपरमाणुतही सामावलेले (बिंदूतही सिंधूचे गुणधर्म सामावलेले)

अर्जुनाला विराट विश्वरूप दर्शन झाले साक्षात्कार झाला तो या परब्रह्माचा!

निर्गुणाच्या उपासनेला देवावर विश्वास नसला तरी चालेल स्वत:वर श्रद्धा हवी म्हणजे झाले.

अंतर्यात्रा आधाराशिवाय. आकाशात झेपच जणु. इथे रस्ते नाहीत, पाऊलवाटा, पाऊलखुणाही नाहीत. स्वत:चा मार्ग स्वत: शोधायचा. संप्रदाय, गुरू मंदिर, ग्रंथ विचार काहीच नाही हा ध्यान योग.

यात मूर्तीचे, फोटोच, व्यक्तीचे कशाचेच ध्यान नाही. नाम जपही नाही. श्वासावर लक्ष केंद्रीत करणे. नामाशिवाय जप अंतर्नाद-अजपाजप. यात साधकाला सिद्धी प्राप्त होते. त्यातच तो अडकतो. पुढील वाटचाल करायची विसरतो. त्याच्या गतीला या सिद्धी अडथळा करतात. म्हणून लाखो करोडोत एखादाच मला येऊन मिळतो. बाकी सर्वांना मला प्राप्त करून घेणे क्लेशकारक काम. योगाभ्यास मोठा कष्टप्रद अभ्यास मार्ग आहे. आकार, विकार, विचार यांचा त्याग म्हणजे अंतर्यात्रा. उपासनेची दुसरी पद्धत अंतर्यात्रेच्या बिनचुक उलट दिशेने यात्रा करायची. बाह्य विश्व संशोधन-स्थूल विश्वाचा त्याग, जीवन, प्रत्यक्ष घटना, विशिष्ट काळ, विशिष्ट स्थळ या सर्व व्यक्त विश्वाचा त्याग करून संशोधन. कोणत्याही वस्तूचे घटनेचे पापुद्रे काढून टाकीत आत डोकावत जाणे. डिस्कव्हरी म्हणजे कव्हर, आच्छादन दूर करणे (मायेचे आवरण) स्थूलाचा त्याग करून मूळ स्वरूपाचे दर्शन.

| परम सत्य-परब्रह्म-अक्षर ब्रह्म कसे आहे? | सगुण व्यक्त ब्रह्म कसे आहे ? |
| --- | --- |
| • जडता रहित शुद्ध चैतन्य स्वरूप, सूक्ष्म, निराकार अनंत | जड, स्थूल |
| • उग्र, संहारक, सर्वव्यापक, कालातीत अमृत | सौम्य आनंददायक |
| • सहस्त्र सूर्याचे तेज, देदिप्यमान, चैतन्याचा सागर, स्वरूप प्रलय, दाहक | शांत, शीतल प्रकाशी विश्व विष्णुचे साकार रुप |
| • क्लेशकारक, असह्य, असाध्य | सहज सुलभ, साध्य-सुसह्य |
| • जीवनाचा अंत विलय | विश्व भगवंताचा प्रकाश |
| • अद्वैत साक्षात्कारी | जीवन आनंदमय |
| • ज्ञानमय | द्वैतभाव |
| • अद्वैताचा साक्षात्कार पण जीवनाचा विलय (अंतिम सत्य) पण ते ज्ञान | अज्ञानमय<br>द्वैताचा अनभुव, या विश्वाचा अनुभव पण ते अज्ञान |
| • अतिंद्रिय (बुद्धि मन) | इंद्रियगम्य |

म्हणून या परमात्म्याचा अद्वैत साक्षात्कार कितीही सत्य असला तरी तो नकोसा होतो. मग काय करायचे? ज्ञानदेव याचे उत्तर देतात - अद्वैतच द्वैतात उतरले आहे. द्वैतात अद्वैत नटलेले आहे. एकमेव परब्रह्म सर्वत्र भरलेले आहे. 'अनंत रुपे अनंत वेषे देखिला म्या त्यासी' असे अनुभवायचे - हा अमृतानुभव.

देव, देऊळ एकाच डोंगरात कोरलेले

दाग दागिने- एकाच सोन्याचे

गाडकी मडकी - एकाच मातीची

सर्व सृष्टि - एकाच परब्रह्मापासून बनलेली

- सारे विश्व म्हणजेच भगवंताचा प्रकाश ! त्याचे प्रगट होणे !
- सारे सगुण साकार त्या निर्गुण निराकारानेच पेलले आहे.
- विश्वाच्या विविधतेत एकत्वाचे दर्शन हेच समदर्शन. विश्वाचीत विविधता ही माया असूनही परब्रह्माचे एकत्व भंग पावलेले नाही. ही माया त्याला लपवीत नाही तर त्याला अनंत रूपाने प्रगट करते.

योग साधनेने एकत्वाचे दर्शन घेऊन परत फिरलेले, ब्रह्म साक्षात्कारानंतर जगाच्या कल्याणार्थ परत फिरलेले ते सद्गुरू !

भगवद्गीतेचा भक्तियोग हा 'योग रुप' आहे. एकत्वच विविधतेने नटलेले आहे, या समदर्शन देणाऱ्या योगानुभवातानू जे भावजीवन निर्माण होते त्याला भक्ती म्हणतात.

- विश्व हे विष्णुचे प्रत्यक्ष सगुण साकार रुप ! या भावनेने जीवन व्यतीत करणे म्हणजेच सगुणोपासना ! 'जे जे भटे भूत । ते ते मानी भगवंत ।
- ही सगुणोपासना कष्टदायक, दाहक, उग्र, संहारक नाही.
- यात विश्वाचे अस्तित्व शिल्लक राहते. आपणास जीवनाची ओढ आहे म्हणून स्वरुप प्रलयाचा मार्ग नकोसा वाटतो.
- द्वैतातच अद्वैत अनुभवणे हा अमृतानुभव. वस्तुजातातील आत्मरूप योग्यास दिसते. एकत्व विविधतेने नटलेले हेच समदर्शन हीच भक्ती
- देहाशी इंद्रियाद्वारे एकरूप होतो तो 'मी' , 'अहं'
- चराचर सृष्टिशी मनाने, भावनेने, ध्यानाने एकरूप होतो तो 'आत्मा', संकुचित, स्वार्थी, इंद्रियांचा दास, अहंकारी असणारा भक्त होऊ शकत नाही. भक्ती योगरुप आहे.

भावनेने केलेल्या 'यज्ञास' उपासना म्हणतात. यज्ञ म्हणजेच अर्पण करणे. अशी उपासना करणाऱ्याचा मी मृत्यू संसार सागरातून म्हणजेच भव सागरातून उद्धार करतो.

तेषामहं समुद्धर्ता मृत्यु संसार सागरात ।<br>
भवामि न चिरात्पार्थ मय्यावेशितचेतसाम् ॥७:१२

मृत्यू-काल, गती, संसार-द्वन्द्वे, संसार द्वंद्वात्मक आहे म्हणजे सुख-दुःख, राग-लोभ, माया-मोह, जय-पराजय, द्वंद्वात्मक म्हणजे मिथ्या या मृत्यू संसार सागरातून तरून जाण्याचे चार मार्ग आहेत.

१) योगाने २) भक्तीने ३) मन बुद्धी परमात्म्यात ठेवून ४) कर्म फलाचा त्याग राहू हेही परमात्म्याचे सगुण साकार प्रतिकच !

परमात्म्यासाठी कर्मे करणे म्हणजे तर देव कोणत्याही रूपात येईल सारी रुपे त्याचीच ना ! 'सर्वाभूती परमेश्वर ।'

- परमात्म्याचे निर्गुण निराकार (विश्वरूप) स्वरूप विराट उग्र असले तरी ते परमात्म्याचे ऐश्वर्य, महातेज आहे.
- सारे अवतार त्या महातेजाच्या किरण शलाका

परम सत्य, परब्रह्म, चैतन्याची दर्या, अव्यक्त, अक्षर ब्रह्म याचे दिव्य दर्शन (विश्वरूप दर्शन) दाहक, असह्य, जीवनाचा बिलय करणारं म्हणून परमात्म्याचा अद्वैत साक्षात्कार कितीही सत्य असला तरी तो सर्व मानवांना पेलणारा नाही म्हणून ज्ञानेश्वरांनी सांगितलेला मध्य मार्गच बरा सर्वांसाठी - 'अनंत रुपे अनंत वेषे देखिला म्या त्यासी ।'

- द्वैतात अद्वैत नटलेले आहे.
- द्वैतात अद्वैत उतरलेले अनुभवायचे
- हे विश्व परब्रह्माचे प्रगट रूप. भगवंताचा प्रकाश
- सारे सगुण साकार निर्गुणाने पेललेले आहे.

विश्वाच्या विविधतेत एकत्वाचे दर्शन (योग दर्शन)

जीवनाचा हेतू 'स्वरुप प्रलय' अनुभवणे हा नसून 'स्वरुपानंद' भोगणे हा आहे, म्हणून सगुण भक्तीच श्रेष्ठ. तुज सगुण म्हणू की निर्गुण रे

सगुण निर्गुण एक गोविंद रे -

**आशा भिडे**

बी/९, विजय अपार्टमेंटस्,
'आराधना' टॉकीजजवळ,
ठाणे (प.) - ४०० ६०२.
दूरध्वनी : २५४१ ०१४०

•••

## मकर संक्रान्त आणि तारखा

मकर संक्रान्तीचा दिवस आपल्या भारतीय पंचांग पद्धतीनुसार निश्चित होत असतो. सूर्याने मकर राशीमध्ये प्रवेश करण्यानुसार हा दिवस निश्चित होतो. साधारणपणे हा दिवस १४ जानेवारीला येतो. पण हे काही कायमचे खरे नाही. पंचांगकर्ते खगोल अभ्यासक दा. कृ. सोमण यांनी पुढील काळातील संक्रान्त आणि इंग्रजी महिन्याच्या तारखांबद्दल पुढील माहिती दिली आहे.

- २००४ साली संक्रान्त १५ जानेवारीला,
- २००८ पर्यंत दर ४ वर्षांनी एकदा १५ जानेवारीला,
- २०११ ते २०४८ पर्यंत दर ४ वर्षांत तीनदा १५ जानेवारीला,
- २०५० ते २०५४ पर्यंत दर ४ वर्षांत तीनदा १५ जानेवारीला,
- २०८५ पासून २१०० पर्यंत दरवर्षी १५ जानेवारीला,
- २१०१ पासून १६ जानेवारीला आणि
- ३२४६ या वर्षी १ फेब्रुवारीला असेल.

दिशा
नियमित वाचा

आपली मते जाणून घेण्यास
आम्ही उत्सुक आहोत.

# रात्रशाळेच्या दृष्टिकोनातून नवीन अभ्यासक्रम कसा असावा?

*रात्रशाळा ही काळाची गरज कशी याबद्दल 'जानेवारी'च्या अंकात आम्ही लेख प्रकाशित केला होता. त्याच संदर्भात या शाळातून शिकविण्याचा अभ्यासक्रम कसा असावा याबद्दलचे हे विचारमंथन - संपादक*

दर दहा वर्षांनी सुधारित अभ्यासक्रम येत असतो. नवीन अभ्यासक्रमा बरहुकूम पाठ्यपुस्तकांचे पुनर्लेखन केले जाते. अभ्यासक्रमामध्ये फार मोठ्या स्वरुपात क्रांतिकारक किंवा आमूलाग्र अशा प्रकारचे बदल फारसे केले जात नाहीत. तर काही प्रकरणे (पाठ्यांश) वगळणे किंवा काही नवीन प्रकरणांचा समावेश करणे इ. मामुली स्वरुपाचे बदल केले जातात. भाषा विषयांमध्ये त्या मानाने नवीन पाठ्यवेचे किंवा कविता यांचा अंतर्भाव करणे इ. ठळक जाणवण्या इतपत बदल होत असतात. रात्रशाळेच्या मुलांची एकंदरित शैक्षणिक, सामाजिक, कौटुंबिक आर्थिक पार्श्वभूमी दिवसाच्या शाळेतील मुलांच्या तुलनेने सर्वस्वी भिन्न असते. त्यांच्या समस्या वेगळ्या असतात. त्या दृष्टिकोनातून नवीन अभ्यासक्रमाचा आपल्याला विचार करावा लागेल.

पहिली गोष्ट म्हणजे बहुतेक रात्रशाळांचे एस.एस.सी. परीक्षांचे निकाल २०%हून कमी असतात. त्याला अनेक कारणे आहेत. कमी निकालाला अनेक घटक जबाबदार आहेत. त्यामध्ये सर्व सहाही विषय अनिवार्य असणे. इंग्रजी-गणित या कठीण विषयांचा अडसर हे प्रमुख कारण आहे. पूर्वी जुना अभ्यासक्रम असताना इंग्रजी, गणित हे वैकल्पिक विषय होते. विद्यार्थी, इंग्रजी, गणित हे विषय सोडून बसू शकत होता. त्याशिवाय स्पेशल विषय देखील भरपूर होते. टायपिंग, चित्रकला, संगीत, नृत्य, सुतारकाम, व्यापार, शिवणकाम इ. विविध सुमारे १०० च्या आसपास विषयातून जास्तीत जास्त १० विषय निवडण्याची मुभा होती. सर्वसाधारणपणे विद्यार्थी ८ विषय घेऊन बसत असत. त्यापैकी कुठल्याही ७ विषयांमध्ये उत्तीर्ण झाल्यास विद्यार्थी एस.एस.सी. परीक्षा उत्तीर्ण होऊ शकत असे. परंतु १९७५ पासून नवीन अभ्यासक्रमाप्रमाणे सर्व सहाही विषय सक्तीचे झाल्यामुळे पहिल्या प्रयत्नात उत्तीर्ण होणे ही रात्रशाळांमधील विद्यार्थ्यांच्या दृष्टीने अवघड गोष्ट होऊन बसली. रात्रशाळेतील मुले देखील एस्.एस्.सी. परीक्षा उत्तीर्ण होतात. परंतु बहुतेक दुसऱ्या, तिसऱ्या किंवा चौथ्या प्रयत्नात. म्हणून पूर्वीप्रमाणे त्यांच्यासाठी इंग्रजी आणि गणित हे विषय वैकल्पिक असावेत. ज्याला पुढील कॉलेज शिक्षण घ्यावयाचे असेल तो इंग्रजी विषय घेऊन बसेल. ज्याला पुढे विज्ञान शाखेमध्ये प्रवेश घ्यावयाची इच्छा असेल तो गणित विषय घेऊन बसेल अन्यथा इ. ९ वी पर्यंत शिकविले जाणारे इंग्रजी आणि गणित सामान्य मुलांच्या दृष्टीने पुरेसे आहे, असे मला वाटते. पूर्वीप्रमाणेच अंकगणित, इतिहास, भूगोल, ना. शास्त्र, शरीरविज्ञान, आरोग्यशास्त्र, भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र इ. स्पेशल विषय अभ्यासक्रमामध्ये समाविष्ट करावेत. जेणेकरून विद्यार्थ्यांना ज्या विषयामध्ये गती आणि रुची असेल तो विषय निवडण्याचे स्वातंत्र्य राहील.

दुसरी गोष्ट म्हणजे आपले सध्याचे शिक्षण हे जास्तीत जास्त पुस्तकी बनत चाललेले आहे. शिक्षणाचा जीवनाशी फारसा काही संबंध राहिलेला नाही. उपजीविकेच्या दृष्टीने सध्याचे शिक्षण कुचकामी ठरत आहे. कारण या शिक्षणाच्या जोरावर नोकरी मिळत नाही किंवा स्वतंत्र उद्योग-व्यवसाय करता येत नाही. आपले शिक्षण अधिकाधिक अमूर्त आणि केवळ ज्ञानात्मक भागावर भर देणारे आहे. भावात्मक भागावर भर देणे ही तितकेच गरजेचे आहे. हाताला वाव मिळणे, मुलांच्या अंगी असलेल्या युवाशक्तीला, ऊर्जेला वाव मिळणे हे देखील गरजेचे आहे.

अन्यथा या मुलांना प्रचलित अभ्यासक्रमामध्ये गोडी वाटणे दुरापास्त आहे. त्यासाठी नृत्य, गायन, वादन, संगीत, चित्रकला, अभिनय इ. विविध विषयांचा समावेश करणे अत्यावश्यक आहे. व्यावहारिक अंकगणित, संभाषणात्मक इंग्रजी, शरीर विज्ञान- आरोग्यशास्त्र उपयोजित विज्ञान परिसर अभ्यास इ. विषयांचा समावेश करणे आवश्यक आहे.

रात्रशाळांमधील बहुतेक मुले दिवसा कुठे ना कुठे तरी नोकरी करत असतात किंवा उद्योग व्यवसाय करत असतात. त्यासाठी त्यांना अशा कौशल्याचे शिक्षण देणे आवश्यक आहे की, ज्या क्षेत्रामध्ये ते काम करत असतील, त्या व्यावसायिक जगामध्ये त्यांना त्या ज्ञानाचा, कौशल्याचा उपयोग होऊ शकेल. जी मुले नोकरी करत असतील, त्यांना नोकरी मिळविणे सोपे जाईल. व्यावसायिक जगामध्ये त्यांचे यशस्वी पदार्पण होऊ शकेल किंवा त्यांना स्वत:चा असा स्वतंत्र उद्योग, व्यवसाय करणे शक्य होईल. सध्या इ. १० वी पर्यंत 'कार्यानुभव' विषय असतोच. परंतु त्याची मूलभूत उद्दिष्टे आणि त्याची कार्यवाही यामध्ये कुठेही सुसूत्रता नाही. शाळांना पैशाअभावी सुसज्ज कार्यशाळा नाहीत. प्रशिक्षित शिक्षकवर्ग नाही. त्यामुळे या विषयाचे परिणामकारक आणि प्रभावी अध्यापन होत नाही. काही तरी थातुरमातुर शिकवून विद्यार्थ्यांना त्या विषयामध्ये किमान श्रेणी देऊन उत्तीर्ण करणे, एवढाच पर्याय शिक्षकांपुढे असतो. जे विषय निवडले जातात. त्यामध्ये विद्यार्थ्यांना रस नसतो. वास्तविक प्रत्येक शाळेने आपल्या परिसरातून उपलब्ध होणाऱ्या सुविधा आणि सामाजिक गरजा लक्षात घेऊन कार्यानुभवाच्या अंतर्गत विषय निवडणे कोठारी कमिशनला अभिप्रेत होते. परंतु तसे झाले नाही. रात्रशाळांमधील मुलांच्या दृष्टीने सुतारकाम, इलेक्ट्रिकल फिटिंग, स्क्रीन प्रिंटिंग, स्वयंचलित वाहनांची दुरुस्ती आणि देखभाल शिवणकाम इ. अनेक विषयांचा समावेश कार्यानुभवाच्या अंतर्गत करता येईल. जेणेकरून विद्यार्थ्यांना शिक्षणामध्ये गोडी निर्माण होईल. त्याचबरोबर हे विषय त्यांच्या व्यावसायिक जगामध्ये उपयुक्त असल्यामुळे त्यांचे महत्त्व त्यांना अधिक असणार आहे.

वरील गोष्टींचा अवलंब केल्यास रात्रशाळांचे एस्.एस्.सी. परीक्षेचे निकाल निश्चितच उंचावतील. त्याचबरोबर विद्यार्थ्यांना अध्ययनामध्ये रुची निर्माण होईल आणि एस्.एस्.सी. परीक्षेतील अपयशामुळे विद्यार्थ्यांना जे नैराश्य आणि वैफल्य येते, ते देखील येणार नाही. रात्रशाळांवर, शिक्षकांचे वेतन आणि इतर अनुदान यावर शासनाचा जो खर्च होतो, तो ही सत्कारणी लागेल. रात्र शाळांचे निकाल कमी लागत असल्यामुळे अधूनमधून रात्रशाळा बंद करण्याचा विचार शासनाच्या मनात उचल खात असतो, तर ती ही अप्रिय कारवाई करण्याची वेळ शासनावर येणार नाही. शासनाच्या जो खर्च रात्रशाळांवर होत असतो, त्याचा परतावा मिळाल्याचे अंशत: समाधान तरी शासनाला मिळू शकेल. परंतु म्हणतात ना, 'योजक तत्र दुर्लभ:'

श्री. प्र. द. अरदकर
सहशिक्षक
श्रीरंग विद्यालय, ठाणे
भारत नाईट हायस्कूल, ठाणे

•••

**दिशा**

संपर्क :
२५४२ ६२७०
२५३३ ७६७२

# पर्यटन - व्यवसाय : नवे क्षितिज !

*२१ व्या शतकात अनेक नवीन क्षेत्रे, नवीन संधी तरुणांना उपलब्ध आहेत. पर्यटन व्यवसाय हे असेच महत्त्वाचे क्षेत्र. नी. गो. पंडितराव स्पर्धेत या विषयावर सादर केले गेलेले पदवी गटातील एक लक्षणीय भाषा - संपादक*

एका शब्दात माणसाचं वर्णन करायचं झालं तर 'भटक्या' हे विशेषण सार्थ ठरेल. अगदी जन्मापासूनच मानवाची भटकंती सुरू होते. विविध गोष्टींचं कुतूहल किंवा एखाद्या गोष्टीचा शोध माणसाला भटकंतीसाठी प्रवृत्त करतो. शेतीसाठी, उद्योगधंद्यासाठी आपल्या पूर्वजांनी केलेली भटकंती जरी इतिहासजमा झाली असली तरी मानवाची भटकंती मात्र थांबलेली नाही. म्हणजेच या आधुनिक युगात भटकंती पर्यटन म्हणून ओळखला जाऊ लागली.

पूर्वी लोक व्यवसायासाठी वा शिक्षणासाठी एका गावाहून दुसऱ्या गावी जात, हा एवढाच त्यांचा प्रवास. परंतु बदलत्या काळानुसार धकाधकीचं व घड्याळ्याच्या काट्यावरती अवलंबून असं काटेरी जीवन माणूस जगू लागला. या काटेरी जीवनाने माणसाला धन, दौलत मिळवून दिली. परंतु या खडतर जगण्याने माणसाची मन:शांती मात्र पार हिरावून घेतली. या अशा प्रदीर्घ नोकरीनंतर वर्षाकाठी तीन आठवडे वा त्यापेक्षा अधिक अर्जित रजा उपलब्ध झाल्याने लोकंना आराम करावासा वाटू लागला. रोजच्या घर ते कार्यालय याला बांधणाऱ्या कंटाळवाणी जीवनातून बाहेर पडण्यासाठी माणसाला निसर्गाच्या सान्निध्यात जावसं वाटू लागलं आणि त्यातूनच अशा निसर्गाच्या कुशीत पर्यटनाचा जन्म झाला. म्हणजेच पर्यटन ही आज एक गरज बनू लागली आहे.

या आधुनिक काळात पर्यटन हा एक स्वतंत्र राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय उद्योग म्हणून विकसित झाला आहे. देशातील व परदेशातील पुरावास्तू, इतिहास प्रसिद्ध व निसर्गरम्य स्थळे, प्राचीन कलानिर्मितीची केंद्रे, पवित्र तीर्थक्षेत्रे इत्यादींचे आकर्षण ही पर्यटनामागील मुख्य प्रेरणा ठरते. पर्यटन जरी या शतकात विकसित होऊ लागले असले तरी पश्चिमी प्रबोधन काळात त्याची पायाभरणी झाली. थॉमस कुकने ६०० लोकांची लीसेस्टर ते लाफबरो अशी रेल्वे सहल आयोजित केली होती. १८८५ च्या पॅरिस प्रदर्शन काळात कुकने लीसेस्टर ते कॅले अशा सहली काढल्या व पुढल्याच वर्षी संबंध यूरोपची भव्य अशी वर्तुळाकार सहल यशस्वीपणे घडवून आणली. काही वर्षांनंतर कुकने मोठ्या प्रमाणात पर्यटक तिकीटे विकण्याचा एजन्सी व्यवसाय सुरू केला. अशा तऱ्हेने आधुनिक पर्यटन युगाचा प्रारंभ झाला.

आज अनेक देशात पर्यटन हा आर्थिक उत्पन्नाचा प्रमुख व्यवसाय झाला आहे. आधुनिक अर्थशास्त्रीय परिभाषेत पर्यटक ग्राहक वा उपभोक्ता समजला जातो. पर्यटनाचे क्षेत्र अंतर्देशीय तसेच आंतरराष्ट्रीय असते. जुन्या पर्यटन स्थळांची व्यवस्था राखणे व नवीन पर्यटन स्थळे विकसित करणे ही पर्यटन उद्योगाची महत्त्वाची अंगे होत. अनुषंगाने देशी-परदेशी पर्यटकांना आकर्षित करण्यासाठी उत्तम वाहतुकीच्या व राहण्या-खाण्याच्या सोयी उपलब्ध करून देणे हे पर्यटन उद्योगाचे महत्त्वाचे घटक होत. समजा, जर आपण एखाद्या पर्यटन स्थळाला जायचे म्हटले तर तिथे जाण्यासाठी लागणारी वाहतुकीची सोय, तिथे गेल्यानंतर एखाद्या चांगल्या हॉटेलमध्ये राहण्याची, आपल्या खाण्याची सोय अशा अनेक गोष्टी पर्यटन व्यवसायात येतात. या सुविधा पुरविणाऱ्या विविध व्यक्तींना पर्यटन उद्योगामुळे रोजगार उपलब्ध होतो. तसेच आपण राहत असलेल्या हॉटेलमध्ये विविध प्रकारच्या सुविधा पुरवल्या जातात,

म्हणजेच आपल्या खोलीची सजावट, आजूबाजूचं वातावरण प्रसन्न ठेवण्यासाठी लावलेली फुलंझाडे या सर्वांवरती देखरेख ठेवण्यासाठी नेमलेल्या व्यक्तींना रोजगार उपलब्ध होतात. म्हणजेच पर्यटन व्यवसायात सजावटकार, उद्यान विद्या तज्ज्ञ अशा अनेक क्षेत्रातील व्यक्तींना रोजगार संधी उपलब्ध होतात.

तसेच पर्यटन उद्योगामुळे सेवा उद्योगांना मानाचे स्थान प्राप्त झाले असून व्यापाराचे प्रमाण व परिणाम यांचा विचार देखील झाला आहे. पर्यटनावर पैशाचा जो प्रत्येक एकक खर्च होत असतो, तो संबंध अर्थव्यवस्थेत फिरत राहतो आणि त्या योगे त्याच्याशी ज्या ज्या लोकांचा संबंध येतो, त्यांचा वाढीव प्रमाणात फायदा होतो. अर्थशास्त्रज्ञांनी पर्यटनाचा हा गुणक परिणाम भारताच्या बाबतीत ५ एवढा काढला आहे. सोप्या शब्दात सांगायचे झाले तर एका पर्यटकाचा एक रूपया खर्च झाल्यास, त्यायोगे अर्थव्यवस्थेमध्ये अंदाजे ५ रुपये किंमतीची उलाढाल होते.

पर्यटन हा प्रथम प्रधान सेवा उद्योग असल्यामुळे आणि भारतासारख्या विकसनशील देशात मोठ्या संख्येने श्रमिकांची उपलब्धता असल्याने पर्यटन उद्योगाचा विकास बेकारी व अर्धरोजगारी या समस्यांचे काही प्रमाणात निराकरण करू शकतो. तसेच पर्यटन व्यवसायातील रोजगाराचे स्वरूप विविधांगी असल्यामुळे त्याचा फायदा लहान-मोठ्या वयोगटातील माणसांना, शिक्षित-अशिक्षित, नागरी-ग्रामीण अशा प्रकारच्या लोकांना रोजगाराच्या स्वरूपात मिळतो. उदा :- पर्यटकांना आकर्षित करणारं शिर्डीचं साईबाबांचं मंदिर जर घेतलं तर मंदिराच्या परिसरात पूजेचं साहित्य, फळं अशा अनेक वस्तू तेथे विकल्या जातात. त्यातूनच लोकांना रोजगार उपलब्ध होतो. तसेच रेल्वे फलाटावर काम करणारा हमाल, हॉटेलमधील आचारी, व्यवस्थापक, कारकून, स्वागतकार अशा अनेक प्रकारच्या रोजगार संधी पर्यटन व्यवसायात उपलब्ध होतात. एखाद्या लहान गावात पर्यटन स्थळ असेल व गावातील एका व्यक्तीने पर्यटकांना दूरध्वनीची सोय उपलब्ध करून दिली तर त्यातून त्या व्यक्तीला रोजगार उपलब्ध होतो.

तसेच भारतात सर्वत्र लघुउद्योगांचे मोठ्या प्रमाणावर जाळे पसरले आहे. विदेशी पर्यटकांमुळे कलाकुसरीच्या व खास देशी बनावटीच्या हस्तकलात्मक वस्तू बनविणाऱ्या लघु व कुटिरोद्योगांना प्रोत्साहन मिळाले असून आंतरराष्ट्रीय बाजारात या वस्तूंना चांगलेच व्यासपीठ लाभले आहे. काश्मीरची शाल, लोणावळ्याच्या चिक्क्या आता जगप्रसिद्ध झाल्या आहेत. पर्यटन हा एक असा उद्योग आहे की ज्याच्यायोगे प्रगत व समृद्ध राष्ट्रांकडून अधिकतर झालेली सर्व प्रकारची साधनसामग्री विकसनशील राष्ट्रांकडे संक्रमित होऊ शकते. तसेच आंतरराष्ट्रीय पर्यटनामुळे विदेशी चलन मिळते म्हणूनच विदेशी पर्यटकांना आकर्षित करण्याचा हेतू हा केंद्रबिंदू समजून पर्यटन सुविधांच्या विकासाकरिता सरकारी पैसा खर्च करण्यासाठी जगातील सर्वच राष्ट्र प्रगतशील आहेत. भारताला देखील पर्यटनाचे महत्त्व पटल्यामुळे प्रत्येक राज्यात पर्यटनाच्या विकासाला प्रोत्साहन देण्यासाठी पर्यटन विकास केंद्रांची स्थापना करण्यात आली आहे. आपल्या महाराष्ट्रात M.T.D.C. तसेच केरळमध्ये K.T.D.C. या सरकारी संस्था पर्यटनाचा विकास करण्यासाठी कार्यरत आहेत. 'साऊथ एशिया रीजनल ट्रॅव्हल कमिशन' या आयोगाचा भारत एक सदस्य असून १९७५ मध्ये भारताला या आयोगाचे अध्यक्षपद मिळाले होते.

भारत हा सौंदर्याने व कलात्मकतेने नटलेला असून हजारो वर्षांचा इतिहास व संस्कृतीचा वारसा त्यास लाभला आहे आणि याच गोष्टींचा आता सरकार उपयोग करत असून पर्यटनास यामुळे चालना मिळत आहे. संपूर्ण भारत नीट पाहण्यासाठी किमान एक वर्षाचा कालावधी लागतो, त्याचं सौंदर्य एका महिन्यात पाहता येत नाही, असे अनेक अनुभव विदेशी पर्यटक आपल्याला सांगून जातात. याची जाणीव

सरकारला देखील असल्यामुळे पर्यटनाच्या विकासासाठी भारतात पदवी अभ्यासासाठी 'पर्यटन' हा विषय उपलब्ध केला गेला आहे. तसेच पर्यटक विषयक शिक्षण देणाऱ्या संस्था देखील कार्यरत असून त्यात जगप्रसिद्ध S.O.T.C. ही संस्था आघाडीवर आहे. विविध खाजगी प्रवासी संघटना एकाच प्रकारच्या सुविधा आणि सरसकट सहली आयोजित करू लागल्या असून भारतातील नामवंत केसरी टूर्स तसेच राज ट्रॅव्हल्स् या खाजगी संस्थेद्वारे आता विदेशातही प्रवास करण्याच्या सोयी उपलब्ध झाल्या आहेत. या अशा टूर्स संस्था पैशाच्या मोबदल्यात आपल्या राहण्या, खाण्याची, फिरण्याची सर्व व्यवस्था उत्कृष्ट रीत्या पार पाडतात. मुंबई दर्शन ते काश्मीर-कन्याकुमारी पर्यंतच्या सहलींचे आयोजन या खाजगी पर्यटन संस्थेमार्फत केले जाते. या सर्वांचं नियोजन करण्यासाठी संस्थेला लागणाऱ्या माणसांना त्यामुळे एक उत्तम रोजगार मिळतो. त्यात पर्यटन प्रतिनिधी, मार्गदर्शक कार्यालयातील कर्मचारी यांचा समावेश होतो. तसेच या संस्था आपली जाहिरात करण्यासाठी प्रसार माध्यमांवर मोठा खर्च करतात. म्हणजेच पर्यटनामुळे जाहिरातीच्या क्षेत्रात देखील आर्थिक उलाढाल होते.

पर्यटन हा नुसता आरामासाठी केलेला प्रवास नसून पर्यटन स्थळांचा उपयोग विद्यार्थ्यांच्या ज्ञानात भर घालण्यासाठी देखील केला जातो. उदा :- आर्किटेक्चरच्या विद्यार्थ्यांनी जर ताजमहल, चार मिनार सारख्या उत्तम शिल्प असलेल्या वास्तूंना भेट दिल्यास त्यांच्या ज्ञानात नक्कीच भर पडेल. इतिहास प्रेमींना गड, किल्ले नेहमीच आकर्षित करतात. तसेच प्राणीशास्त्र व वनस्पतीशास्त्र शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना वनउद्यानांचा अभ्यास दौरा देखील उपयुक्त ठरतो. पर्यटन क्षेत्राचा विकास म्हणजे मोठ्या प्रमाणावर नैसर्गिक बाबींचे केलेले संवर्धन होय आणि यातूनच इको-टुरिझमची नवी संकल्पना जन्माला आली असून पर्यटनाच्या प्रसारातून पर्यावरणाचेही संवर्धन केले जावे, हे यामागचे धोरण आहे. देशातील सर्वात जास्त अभयारण्ये महाराष्ट्रात असून त्यांच्या विकासासाठी ही योजना राबविण्यात येणार आहे.

त्याचप्रमाणे आर्थिक लाभांखेरीज पर्यटनाच्या योगे विविध देशांतील भिन्न-भिन्न लोक एकत्र येऊ लागले आहेत. तणावांनी भरलेल्या सध्याच्या जगात आंतरराष्ट्रीय सामंजस्य व सदिच्छा यांचे वर्धन करण्याच्या दृष्टीने पर्यटनाचा बहुमोल उपयोग होतो. देशांतर्गत पर्यटनासाठी हीच गोष्ट लागू आहे. भाषा आणि चालीरीती यांचे वैविध्य असलेल्या भारतासारख्या खंडप्राय देशात पर्यटन हे राष्ट्रीय एकात्मता साधण्याचे प्रभावी साधन होय. एकूणच जगाला जोडणारा दुवा म्हणजे पर्यटन व्यवसाय, याचे नाव अग्रस्थानी घेण्यास आता काहीच हरकत नाही. ११ सप्टेंबरच्या आतंकवादी हल्ल्यानंतर पर्यटन व्यवसायास खिळ बसेल असे वाटले होते. परंतु आजही हा व्यवसाय जोमाने सुरू आहे. जरी काश्मीरमध्ये दहशतवादी कारवाया सुरू असल्या तरी अमरनाथ यात्रेला देशातून भाविक मोठ्या उत्साहाने जातात. तसेच सध्या श्रीलंकेत सुरू असलेल्या आयसीसी चॅम्पियन्स ट्रॉफी या क्रिकेट सामन्यांमुळे श्रीलंकेच्या पर्यटन व्यवसायात भर पडल्याचे दिसून आले आहे. म्हणजेच पर्यटनाला आता कोणतीच सीमा उरलेली नाही. एक नवं क्षितिज म्हणून तेजस्वी सूर्यासारखं पर्यटन व्यवसाय जोमाने विकसित होत आहे. कुणास ठाऊक पुढल्या दहा वर्षांत तुमच्या अधिपत्याखाली चंद्रावर जाणाऱ्या सहलींचं आयोजन करण्यात येईल... !

**गीतेश शिंदे,**
प्रथम वर्ष, विज्ञान (पदवी)
बांदोडकर विज्ञान महाविद्यालय, ठाणे

**दिशा**
नियमित वाचा.

# मराठी साहित्यातील 'शांता-दुर्गा'

*मराठी साहित्यातील शांताबाई शेळके व दुर्गाबाई भागवत यांचे साहित्य मराठी जीवनाला समृद्ध करणारं आहे. कै. नी. गो. पंडितराव वक्तृत्व स्पर्धेत हा विषय आयोजकांनी मुद्दाम ठेवला होता. 'आंतरराष्ट्र महिला दिना'चे औचित्य साधून हा लेख देत आहोत. आजच्या महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना त्या साहित्याबद्दल काय वाटते याची कल्पना देणारे हे भाषण- संपादक*

'माझ्या मऱ्हाटीचिये नगरी
साहित्य सोनियाच्या खाणी'

ही ज्ञानेश्वरांची रचना म्हणजे त्रिकाल बाधित सत्य आहे. कारण मराठी साहित्य क्षेत्रात अनेक दिग्गज व्यक्तिमत्त्वे आपापला वेगळा ठसा निर्माण करून या साहित्याला समृद्धता देऊन गेली व आजही देत आहेत. मराठी साहित्यामध्ये स्त्रियांच्या लेखणीनं आपल्या स्त्रीत्वाचा जागर अंतर्यामात घुमवत आपल्या संवेदनांना जिवंत, रसरशीत शब्दरुप दिलं. अगदी संतांच्या काळापासून ही परंपरा चालत आली आहे. अगदी मुक्ताई, जनाई, महदंबा, वेणाबाई यासारख्या संत कवयित्रींपासून आजच्या पिढीतील साहित्यकांपर्यंत सर्वांनीच हा वारसा चालविला आहे.

'पदबंध नागर । तेच रंगयिले अंबर ।
जेथ साहित्य वाणे सपूर । उजाळाचे ॥
हा हो नवल नोहे देशी ।
मऱ्हाटी बोलिजे तरी ऐशी ।
वाणे उमटता हे आकाशी ।
साहित्य रंगाचे ॥

म्हणजेच लालित्य, माधुर्य यांनी सजलेल्या शब्दांच्या नागरपदबंधाचे विविधरंगी, मुलायम वस्त्र लेवून त्यातूनच साहित्याचे दिप्तीमान तेजःपुंज निर्माण होणार आहेत, असे आश्वासन ज्ञानेश्वरीच्या मंगलचरणात ज्ञानेशांनी महाराष्ट्राला व मायमराठीला उद्देशून केले आहे.

मराठी सारस्वतांना ज्ञानेश्वरांनी दिलेल्या या आश्वासनाची पूर्तता गेल्या ७७५ वर्षात असंख्य मान्यवर साहित्यकांनी केली.

याच वाटेवर आपल्याला भेटतात शांत साहित्य सरितेप्रमाणे भासणाऱ्या शांताबाई शेळके आणि ज्ञानयोगिनी दुर्गाबाई भागवत.

या दोन्ही स्त्री लेखिकांचा स्वतःचा असा वैशिष्ट्यपूर्ण ठसा होता.

शांताबाई शेळक्यांचा वेगळेपणा म्हणजे त्यांना जे भावले तेच त्यांनी लिहिले. वाचन, लेखन, मनन हेच जणू त्यांचे छंद होते. म्हणूनच तर त्यांचे लेखन कर्तृत्व अष्टपैलू होते. साहित्यिक, कवयित्री, गीतकार अशा वेगवेगळ्या प्रतिभा आणि प्रतिमांचा एक जिवंत आविष्कार म्हणजे शांता शेळके.

कुतुहलाने संपन्न अनुभव विश्वातून मनुष्य स्वभावाचे विविध कंगोरे शोधण्याच्या प्रेरणेतून त्यांचे लिखाण घडत गेले. शांताबाईंनी 'जन्मजान्हवी', 'गोंदण', 'कळ्यांचे दिवस', 'फुलांच्या राती' इ. कवितासंग्रह, 'अनुबंध', 'काच कमळ', 'मुक्ता' असे अनेक कथासंग्रह, 'ओढ', 'स्वप्नतरंग', 'धर्म', 'पुर्नजन्म' इ. कादंबऱ्या, व्यक्तिचित्रे, लेखसंग्रह, नवयुग साप्ताहिकाचे उपसंपादन, अन्य पुस्तकांचे संपादन, बालसाहित्य, चित्रपटविषयक लेखन, मेघदूत इ. ग्रंथाचे यथार्थ अनुवाद, आत्मचरित्रात्मक ललितलेखन, 'तोच चंद्रमा नभात', 'शूर आम्ही सरदार आम्हाला काय कुणाची भीती' अशी दीडशेहून अधिक

सुमधुर गीते त्यांच्या समृद्ध लेखणीतून पाझरली. प्राध्यापिका म्हणून त्यांनी हिस्लॉप, रूईया व महर्षी दयानंद कॉलेज येथे ज्ञानदानाचे महान कार्य केले. कदाचित यातूनच त्यांना शब्दांचा मळा फुलविण्याची प्रेरणा मिळाली.

शांताबाईंच्या साहित्याचा दर्जा हा परिपक्व आणि प्रगल्भ होता. निसर्गाशी त्यांनी एक अलौकिक नाते जोडले. निसर्गाच्या नात्याविषयी त्या म्हणतात -

'शहरे ओलांडून, खेड्यात गेले पाहिजे. काळ्या ढेकळांनी भरलेल्या शेताचा स्पर्श पायांच्या तळव्यांना अनुभवू दिला पाहिजे, डोळे दुखेपर्यंत निळ्या आभाळाकडे पाहिले पाहिजे, वाहते पाणी सर्वांगाने भोगले पाहिजे. आजचे हे जग विसरून !' हे शब्द आज आपण प्रत्यक्षात आणण्याची वेळ आली आहे.

या शांत साहित्यसरितेला आळंदी सारख्या ज्ञानेश्वरांच्या समाधीस्थानी मराठी साहित्यसंमेलनाचे अध्यक्षपद भूषविण्याचा सन्मान प्राप्त झाला. या संमेलनाच्या अध्यक्षस्थानी त्या म्हणाल्या, 'ज्ञानेश्वरांच्या समाधीपुढे नतमस्तक होत कवी अनिलांच्या या काव्यपंक्ती ओठांवर आल्या -

*'नसे संत कोणी, भाविक ना भक्त,*
*असे जीव मात्र, जीवनी आसक्त,*
*तुमच्या चरणी मस्तक ठेविले,*
*उचलावयाचे भान ना राहिले ॥'*

प्रसिद्धीच्या अत्युच्च शिखरावर पाय ठेवूनही थोरांपुढे नतमस्तक होणारी ही शांताबाईंची विनम्र वृत्ती अलौकिक आहे.

'जीवनात सहजतेने मिळणाऱ्या गोष्टींचा आनंदानं स्वीकार करावा' ही शांताबाईंची जीवनविषयक धारणा. म्हणूनच त्यांच्या एका कवितेत त्या लिहितात -

*'सहज फुलू द्यावे फूल*
*सहज दरवाळावा वास*
*अधिक काही मिळविण्याचा*
*करू नये अट्टाहास*
*सुवास-पाकळ्या-पराग-देठ-फूल*
*इतकीच देते ग्वाही*
*अलग अलग करू जाता*
*हाती काहीच उरत नाही'*

तीव्र स्मरणशक्ती, भाषा प्रभुत्व, मनमिळाऊ स्वभाव आणि शब्दांचा चालता बोलता कोष असणाऱ्या, साहित्य क्षेत्रात सर्वत्र मनमुराद संचार करणाऱ्या, प्रस्तावना लिहून नवोदितांना प्रोत्साहित करणाऱ्या या तीन दशकातील थोर साहित्यिका !

काहीच दिवसांपूर्वी निसर्गातील ही खळाळणारी साहित्य सरिता आपल्या दुर्दैवाने कायमची शांत झाली.

त्यांच्याबरोबच समकालीन असलेल्या तडफदार स्त्री लेखिका दुर्गा भागवत यांनी त्यांच्या अफाट लेखनाने, प्रतिभेने साहित्य क्षेत्रात नवा मानदंड निर्माण केला. दुर्गाबाईंचा जन्म इंदूरचा, १० फेब्रुवारी १९१० सालचा. त्यांनी बी.ए., एम.ए. पुढे पी.एच.डी. पर्यंत शिक्षण केले. म. गांधी, थोरो, टॉलस्टॉय, भागवत हे त्यांचे आदर्श होते.

दुर्गाबाईंनी साहित्य क्षेत्राबरोबरच अनेक क्षेत्रात कर्तृत्वाची भरारी घेतली. त्यांनी समाजशास्त्र विभागप्रमुख, साहित्य सहकारचे १९५७ साली संपादन, रॉयल एशियाटिक सोसायटीचे क्रियाशील सदस्य म्हणून कार्य केले. १९८८ च्या हैडेलर्ग विद्यापीठातील प्राच्य विद्यापरीक्षेच्या अध्यक्षा, नाट्य, तमाशा परिषदेच्या तसेच १९७६ च्या कऱ्हाडच्या अखिल भारतीय साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद त्यांनी भूषविले.

'मन केले ग्वाही' या अंतर्खुणेतून 'अभिव्यक्ती सामर्थ्य', 'संवेदनात्मक परिमाण', 'आशय अविष्कार' यांचा सुंदर मिलाफ साधून दुर्गाबाईंनी त्यांचं साहित्य घडविलं.

'महानदीच्या तीरावर' ही कादंबरी, उत्कृष्ट लघुनिबंध, ललितलेखन; 'पैस', 'डूब', 'ऋतूचक्र' असे सुंदर साहित्य, समीक्षा लेखन, शासन साहित्यिक व बांधिलकी, भाषणे, आत्मकथात्मक, प्राणीविषयक लेखन, इंग्रजी ग्रंथ, शोधनिबंध, जातककथा, पाली ग्रंथ, नवलिका, बालसाहित्य, देहोपनिषद सारखी अप्रतिम कविता अशी दीर्घ साहित्य मालिका दुर्गाबाईंनी रचली.

दुर्गाबाईंच्या लेखनातून त्यांचे सृष्टीचक्राचे भान, मानवी सुख-दुःखे, मानवी संस्कृतीची एकात्मता यांचा शोध घेतलेला दिसतो. तो त्यांच्या कुतूहलातून व ज्ञानलालसेतून घडला.

'विचार स्वातंत्र्याचा पुरस्कार', स्त्रीला माणूस म्हणून जगण्याचा हक्क आणि डोळे उघडून जीवनाकडे पहाण्याचा दृष्टिकोन दुर्गाबाईंनी दिला.

मी का लिहिते? या प्रश्नाच्या उत्तरात त्या म्हणतात की, 'माझ्यासारख्या अंतर्मुख मनाच्या व्यक्तींना स्वतःच्या भावनांना व चिंतनाना मुक्त अवसर द्यायला दुसरा मार्ग नाही, याच उद्देशाने मी लेखन केले, भ्रमंती केली.'

प्रच्छन्न अत्याचारामुळे लोकशाहीवर झालेल्या आघाताच्या विरोधी संघर्षात वयाच्या ६५ व्या वर्षी दुर्गाबाईंनी महाराष्ट्रात सर्वदूर स्वातंत्र्याचा 'स्फुल्लिंग' पेटवला. त्या भयप्रद दमन कालखंडात आणीबाणी विरोधी जनमत प्रज्वलित केले. त्यांचे मुक्त विचार हेच त्यांना संस्कृतीचे खरे रक्षक वाटत. म्हणूनच त्या म्हणत -

'स्वातंत्र्य सरलं की संस्कृती धोक्यात येते.' साहाजिकच अशा तेजस्वी विचारांमुळे त्यांनी सर्वत्र स्वातंत्र्याचा प्रकाश पसरविला. आणि म्हणूनच दुर्गाबाईंविषयी पुढील हे वर्णन मला भावते.

'तेजस्वी नितळ कांती
तेवि नितळ विचारी मन
दुर्गाबाई संनिद्ध, सरे भ्रांती
होतसे दिवेलागण !'

दुर्गाबाईंच्या या अद्वितीय कार्याने त्यांना महाराष्ट्र शासनाचे अनेक पुरस्कार, विविध भाषिक साहित्य संमेलनांची प्रमुखपदे त्यांना मिळाली.

'मोठ्यांचे मोठेपण ना सहजी येते,
प्रत्यया कुणाच्या खोल असेत ते'

हेच दुर्गाबाईंच्या व्यक्तिमत्वावरून लक्षात येते.

स्पष्टपणा, परखडपणा, निगर्वीपणा, लेखन चतुरस्त्रता रोखठोकपणा, तत्वनिष्ठता, काहीसा विक्षिप्त स्वभाव हे गुण असलेल्या दुर्गाबाई शीघ्रकोपी विदुषी म्हणून ओळखल्या जात. आयुष्यभर स्वातंत्र्याचा व वर्तन शुचितेचा आग्रह धरणाऱ्या दुर्गाबाई ९२ वर्षांचं व्रतस्थ, सुफळ, संपूर्ण आयुष्य जगल्या. ज्ञानोबांच्या मुक्ताईचा जीवनवसा जोपासणाऱ्या दुर्गाबाई देहोपनिषद या आपल्या कवितेत साक्षात मृत्युला म्हणतात,

'मरणा तुझ्या स्वागतास
आत्मा माझा आहे सज्ज
पायघडी देहाची ही
घालूनी मी पाही वाट
सुखवेडी मी जाहले
देहोपनिषद सिद्ध झाले.'

देहोपनिषदाच्या पायघड्या मी घातलेल्या आहेत, मरणा तू केव्हाही ये । असे म्हणून त्या मृत्युंजय झाल्या.

म्हणूनच मराठी साहित्याच्या वैचारिक व ललित चिंतनात्मक साहित्याच्या आपल्यासारख्या वाचकांना देहरूपाने दूर गेलेल्या दुर्गाबाईंची आठवण झाल्यावर मनात म्हणावेसे वाटेल,

'या दुर्गा सर्वभूतेषु
ज्ञानरूपेण संस्थिता ।
नमस्तस्यै, नमस्तस्यै
नमस्तस्यै नमो नमः ॥

शारदेच्या साहित्य मंदिरातील अखंड तेवून प्रकाश देणाऱ्या समईप्रमाणे भासणाऱ्या शांताबाई शेळके व राष्ट्रदुर्गा म्हणून संबोधल्या जाणाऱ्या दुर्गाबाई यावर्षी आपला कायमचा निरोप घेऊन गेल्या अन् त्या क्षणी मराठी साहित्याच्या नभांगणातील दोन तेजस्वी तारे निखळून पडल्यासारखे वाटले.

या दोन्हीही थोर साहित्यिकांनी नवोदितांना प्रोत्साहन दिले. त्यांच्यासाठी प्रस्तावना लेखन केले. कौतुकास्पद नवोदितांच्या कार्याची वाखाखणी केली. नवोदितांसाठी प्रस्तावना लिहून त्यांनी त्यांच्या व्यक्तिमत्वाची एक उजळ बाजू दर्शविली व मराठी साहित्याला नवे आधारस्तंभ मिळवून दिले. त्यांच्या साहित्यरूपाने त्या अजरामर होऊन सदैव आपली स्फूर्तिस्थान बनतील यात शंकाच नाही. तरीही या द्वयींच्या जाण्याने जी झीज मराठी साहित्यात झाली ती भरून निघणे अशक्य आहे.

पण उत्पत्ती स्थिती आणि लय हेच तर सृजनाचे चक्र !

लयाच्या टप्यावर अंतर्नाद घुमू लागतो आणि मन पुकारत रहातं, हळवं होतं अन् व्याकुळ होतं, शांताबाई व दुर्गाबाईंसाठी ! पण आम्ही त्यांच्यासाठी एवढे व्याकुळ का झालो? तर 'त्यांनी शब्द दिले, शब्दांच्या आभाळपणाचा प्रत्यय दिला. जगण्याची असोशी दिली. शब्दांशी खेळ मांडण्याचं वळ दिलं. शांताबाईंच्या कवितेनं तर भावनेच्या स्निग्धार्द्रतेचा, नादलयीच्या साथीनं प्रत्यय दिला तर दुर्गाबाईंच्या लेखणीनं माणसाकडे, निसर्गाकडे किंबहुना पंचमहाभूतांच्या लीलांकडे बघण्याचा नवा दृष्टिकोन दिला. थेट, निर्भय, ताठ आणि रसिल्या वृत्तीचा, पाककृतीच्या वर्णनापासून ते अगदी कदंबापर्यंत... बाईंनी अज्ञातदालनातून प्रवास करीत साहित्यातील लेणी खोदायला शिकवलं. आत हे सारं संचित आमचं - ही आमची पिंपळपान - साहित्यानं हेच तर आम्हाला दिलं.

आणि म्हणून शांताबाई व दुर्गाबाईंना शब्दांची फुले अर्पण करताना मला त्यांच्या साहित्यातील शब्दाशब्दाला आवाहन करीत म्हणावेसे वाटते -

'हे सर्वस्पर्शी, सर्व व्यापी शब्दांनो
या मनाच्या अंतरी भरूनी रहा ।
जीवनाने जे दिले या जीवनी ।
होऊनी रसरूपगंधी व्यक्त हा ।
अमृतासम शांती तृप्ती घेऊनी
या मनीचे त्या मनी फुलवित न्या ।'

**वैशाली प्रकाश बयाणी**
तृतीय वर्ष, कला (मराठी)
प्र.द्वा.कारखानीस कला आणि वाणिज्य
महाविद्यालय, अंबरनाथ.

• • •

# ग्रंथालय चळवळ आणि पालघर तालुक्यातील वाचन संस्कृती

पालघर येथील सोनोपंत दांडेकर महाविद्यालयाच्या कार्यकारिणीचे कार्यवाहक महाविद्यालयाचे ग्रंथपाल ज्येष्ठ ग्रंथालय कार्यकर्ते श्री. अशोक ठाकूर यांचा हा लेख माहितिपूर्ण आहे. - संपादक

ग्रंथालय चळवळ ही लोकशिक्षणाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची मानली जाते. या चळवळीस लोकाश्रय लाभल्याने सार्वजनिक ग्रंथालये ही सार्वजनिक निधी व शासकीय अनुदान यातून चालविली जातात. या ग्रंथालयात जात, धर्म, लिंग, गरीब श्रीमंत असा भेदभाव न करता सर्वांना मुक्त प्रवेश असतो.

महाराष्ट्रात सार्वजनिक ग्रंथालय कायदा अंमलात येण्यापूर्वी ग्रंथालय चळवळ अस्तित्वात होती. ठाणे जिल्ह्यात तर शतकोत्तर वाटचाल करणारी ग्रंथालये आजही उत्तम तऱ्हेने कार्यरत आहेत. ठाणे जिल्ह्याचे जिल्हा ग्रंथालय, 'मराठी ग्रंथसंग्रहालय' दि. १ जून १८९३ रोजी महाराष्ट्र सारस्वतकार विनायक लक्ष्मण भावे यांनी सुरू केले. महाराष्ट्रातील पहिले मराठी ग्रंथालय म्हणून या ग्रंथालयाचा लौकिक आहे. तसेच सन १८५० मध्ये 'नेटिव्ह जनरल लायब्ररी' म्हणून इंग्रजांनी स्थापन केलेले 'ठाणे नगर वाचन मंदिर' व सन १८६३ मध्ये स्थापन झालले भिवंडी येथील 'वाचन मंदिर' आणि ब्रिटीशांच्याच काळातच स्थापन झालेले मुरबाड येथील ग्रामपंचायतीचे 'भाऊ दाजी गणपत वाचनालय' सन १८९६ मधले आहे. ही चारही ग्रंथालये 'अ' वर्गातील आहेत.

ब्रिटीशांच्या काळात सन १९३९ मध्ये बाळासाहेब खेर यांचे मंत्रिमंडळ असताना फैजी समितीचा ग्रंथालय विषयक महत्त्वाचा अहवाल सादर करण्यात आला होता. त्या अहवालात सुचविलेल्या सुधारणा सरकारने त्वरित अंमलात आणाव्यात म्हणून सार्वजनिक ग्रंथालय क्षेत्रातील कार्यकर्त्यांनी जोरदार प्रयत्न केले होते. त्याचे फलित म्हणजे महाराष्ट्र राज्य अस्तित्वात आल्यानंतर सन १९६७ मध्ये विधान सभेने महाराष्ट्र सार्वजनिक ग्रंथालय कायदा संमत करून तो दि. १ मे १९६८ पासून अंमलात आणला.

हा कायदा संमत करण्यासाठी ग्रंथालयाबद्दल अतिशय प्रेम व आस्था असलेले तत्कालीन विधान सभेचे सभापती व ग्रंथालय समितीचे अध्यक्ष सभापती व ग्रंथालय समितीचे अध्यक्ष मा. कै.वि.स. पागे यांनी कायद्याचा मसुदा परिश्रमपूर्वक तयार केला होता. ग्रंथालय कायद्यानुसार ग्रंथालयाची ग्रंथ संख्या, सभासद संख्या, नियतकालिकांची संख्या, इमारत इत्यादींचा विचार करून ग्रंथालयाचे 'अ' 'ब' 'क' 'ड' असे चार वर्ग करण्यात आले. तसेच जिल्हा ग्रंथालय, तालुका ग्रंथालय व सार्वजनिक ग्रंथालय असा दर्जा निर्माण करण्यात आला आहे. वर्ग व दर्जा यानुसार ग्रंथालयांना महाराष्ट्र शासन दरवर्षी अनुदान देत असते. परंतु इतर राज्यांप्रमाणे महाराष्ट्रात ग्रंथालयावर कर अस्तित्वात नाही. त्यामुळे शासनाने ठरविलेल्या तुटपुंज्या अनुदानावर ग्रंथालये चालविणे फारच अवघड होत चालले आहे. मा. मुख्यमंत्र्यांनी 'गाव तेथे ग्रंथालय' अशी घोषणा तरतूद न करता केलेली आहे. सार्वजनिक ग्रंथालय कर्मचाऱ्यांना सेवाशर्ती लागू नाहीत. त्यामुळे अपुऱ्या अनुदानातून अर्धा खर्च कर्मचाऱ्यांच्या वेतनावर करावा लागतो.पर्यायाने वाचन साहित्य खरेदीवर परिणाम होतो. यासाठी जनतेचा सहभाग वाढला पाहिजे. सध्या महाराष्ट्रात ६५८४ नोंदणीकृत सार्वजनिक ग्रंथालये आहेत. त्यात पालघर तालुक्यांतील फक्त पुढील १२ ग्रंथालये आहेत.

**'ब' वर्ग ग्रंथालये**

१. सावित्रीबाई फुले वाचनालय, टेंभोडे, पालघर
२. महिकावती वाचनालय, माहीम

**'क' वर्ग ग्रंथालये :**

१. लोकमान्य वाचनालय, पालघर
२. भारत वाचनालय, केळवे
३. सार्वजनिक वाचनालय, मनोर
४. जनता वाचनालय, सफाळे
५. उत्कर्ष वाचनालय, एडवण
६. प्रभात वाचनालय, चटाळे
७. लोकमान्य नूतन वाचनालय, शिरगाव
८. सार्वजनिक वाचनालय, मुरबे
९. प्रबोधन वाचनालय, तारापूर
१०. श्री वाचनालय, बोईसर
११. मयूर वाचनालय, माकुणसार

**'ड' वर्ग ग्रंथालये :**

१. सार्वजनिक वाचनालय, सालवड
२. सार्वजनिक वाचनालय, पास्थळ

वरील वाचनालयापैकी टेंभोडे पालघर येथील सावित्रीबाई फुले वाचनालयाला सन १९९५ मधील 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर आदर्श ग्रंथालय पुरस्कार' प्राप्त झाला आहे. ही पालघर तालुक्याला अभिमानास्पद व भूषणावह गोष्ट आहे. परंतु पालघर येथे नगरपालिका अस्तित्वात आल्यापासून सदर वाचनालयाचे व्यवस्थापन नगरपालिकेच्या अधिपत्याखाली गेल्यामुळे स्थानिक ग्रंथालय कार्यकर्त्यांचा उत्साह पाहिजे तेवढा राहिलेला दिसत नाही.

पालघर येथील सोनोपंत दांडेकर महाविद्यालयाच्या सहकार्याने ठाणे जिल्हा ग्रंथालय संघाने जानेवारी १९९९ मध्ये सार्वजनिक ग्रंथालयाचे कार्यकर्ते व ग्रंथपाल यांच्यासाठी एक दिवसाचे मार्गदर्शन शिबिर घेतले होते. या शिबिरात ग्रंथालयातील ग्रंथांचे वर्गीकरण, तालिकीकरण, ग्रंथालयाचा वार्षिक जमाखर्च, शासन मान्यता इत्यादी जिव्हाळ्याच्या विषयांवर प्रा. प्रदीप कर्णिक, प्रा. मोहन पाठक आदी तज्ज्ञांचे मार्गदर्शन प्राप्त झाले होते. परंतु अपेक्षित असा प्रतिसाद त्यावेळी लाभला नाही हे खेदाने नमूद करावेसे वाटते.

पालघर तालुक्यांत अनेक साहित्यिक, पत्रकार, वृत्तसंपादक आहेत तसेच 'पालघर तालुका मराठी साहित्य मंडळ' व 'कोकण मराठी साहित्य परिषदेची पालघर शाखा कार्यरत आहे.' कोमसापचे दुसरे साहित्य संमेलन १९९४ मध्ये केळवे येथे संपन्न झाले होते. परंतु खऱ्या अर्थाने सरस्वतींची मंदिरे म्हणजे शासनमान्य ग्रंथालये तुलनेने फारच कमी आहेत. त्याबाबतीत प्रत्येक गावातील सुशिक्षित तरुणांनी पुढाकार घेणे आवश्यक आहे. बहुतेक गावात शासनमान्य मदिराचे दुकान हमखास दिसेल परंतु शासनमान्य ग्रंथालय असेलच असे नाही, असे विदारक दृश्य दिसते म्हणून ग्रंथालये ही ख ऱ्या अर्थाने सामान्य लोकांची सांस्कृतिक केंद्रे कशी होतील, याचा विचार होणे आवश्यक आहे.

आजच्या वाचन संस्कृतीचा विचार करण्याआधी संस्कृती या शब्दाची इथे अभिप्रेत असलेली व्याख्या स्पष्ट होणे आवश्यक आहे. संस्कृतीबद्दल आचार्य विनोबा भावे म्हणाले होते. संस्कृतीबद्दल बोलताना प्रकृती आणि विकृती या दोन गोष्टींबद्दल सांगणे आवश्यक आहे. एखाद्याजवळ दोन भाकरी असल्या तर खाणे ही प्रकृती आहे. समोर भुकेला माणूस असताना त्याला न देता त्याच्यासमोर त्या खाणे ही विकृती आहे आणि त्या दोन भाकरी सर्वांनी मिळून आनंदाने खाणे ही संस्कृती आहे. वाचनाचेही तसेच आहे. आपण वाचलेले व आपल्याला आवडलेले एखादे पुस्तक सर्वांनी वाचावे यासाठी धडपड करणे ही संस्कृती आहे. वाचनाचेही तसेच आहे. आपण वाचलेले व आपल्याला

आवडलेले एखादे पुस्तक सर्वांनी वाचावे, यासाठी धडपड करणे ही संस्कृती आहे. पण दुसऱ्यांची पुस्तके पळविणे व ती न वाचता ठेवून देणे ही विकृतीच म्हणायला हवी. दुर्दैवाने आपल्या समाजात अशी विकृती माणसे बरीच आहेत. त्यांची विकृती घालविण्यासाठी प्रयत्नशील असणे ही काळाची गरज आहे.

ग्रंथालये ही ज्ञानभांडारे आहेत. तशीच ती मानवाच्या भाषिक म्हणूनच सांस्कृतिक उत्क्रांतीच्या दस्तऐवजांचीही भांडारे आहेत. मातीच्या भाजलेल्या विटांवरील, झाडाच्या सालीवरील ग्रंथापासून ते आधुनिक संगणकीय, इंटरनेट पुस्तकांपर्यंतच्या भाषेचा, ग्रंथाचा विकास ग्रंथालयातून संग्रहित झाला आहे. जतन केला गेला आहे. परंतु समाजाचा ग्रंथालयाकडे पाहण्याचा दृष्टिकोन, ग्रंथालयांची जोपासना, ग्रंथालयाची समृद्धता हा समाजाच्या सांस्कृतिक विकासाचा एक मानदंड आहे. जाणकार वाचन संस्कृती विकसित करण्यात ग्रंथालये व ग्रंथपालांचा फार मोठा वाटा असतो. जगभरची ग्रंथालये यांची साक्ष देतात. वाचन संस्कृती समाजात रुजविण्यासाठी लेखक, प्रकाशक, माध्यमे, ग्रंथविक्रेते व वाचक या सह घटकांच्या सांघिक प्रयत्नांची परस्पर समन्वयाची अतिशय आवश्यकता आहे. सध्याच्या कल्याणकारी राज्याच्या विचारांपुढे शासनाचा सहभाग व पाठिंबाही तितकाच महत्त्वाचा आहे.

पालघर तालुका विस्ताराने मोठा असूनही आज त्यामानाने मोठ्या गावातही सार्वजनिक ग्रंथालय नाहीत याची खंत वाटल्याने केळवे येथील ठाणे जिल्हा ग्रंथालय चळवळीचे अध्वर्यू श्री. रामचंद्र सदाशिव ठाकूर यांनी काही गावांना प्रत्यक्ष भेटी देऊन तेथील कार्यकर्त्यांना ग्रंथालयाचे महत्त्व पटवून सांगून ग्रामपंचायतीद्वारे व सार्वजनिक संस्थांच्या सहकार्याने तालुक्यात काही ग्रंथालयाची स्थापना करून त्यांना शासकीय अनुदान प्राप्त करून दिले आहे व ती आज उत्तम तऱ्हेने सुरू आहेत. ग्रंथालयातील ग्रंथपालांना प्रोत्साहन मिळावे म्हणून त्यांनी ठाणे जिल्हा ग्रंथालय संघाकडे रु. १५,०००/- ची ठेव देऊन तिच्या येणाऱ्या व्याजातून दरवर्षी 'अ' 'ब' 'क' व 'ड' या क्रमाने 'श्री ठाकूर गुरुजी आदर्श ग्रंथपाल पुरस्कार' जाहीर केला आहे. हा पुरस्कार रोख रु. १,०००/- व स्मृतिचिन्ह या स्वरुपात वार्षिक ग्रंथालय संमेलनात दिला जातो.

'गाव तेथे ग्रंथालय' हे शासकीय धोरण प्रत्यक्षात आणण्यासाठी ठाणे जिल्हा ग्रंथालय संघ प्रयत्नशील असून सार्वजनिक क्षेत्रातील कार्यकर्ते पुढाकार घेऊन जर आपल्या गावात सार्वजनिक ग्रंथालय स्थापन करू इच्छित असतील तर यांना निश्चितपणे सहकार्य मिळेल किंवा प्रस्तुत लेखकांशी (सोनोपंत दांडेकर महाविद्यालय, पालघर) संपर्क साधल्यास सार्वजनिक ग्रंथालय सुरू करण्याबाबतच्या कार्यपद्धतीची एकत्रित सविस्तर माहिती उदा. प्रस्ताव कसा पाठवावा, कधी पाठवावा, त्याची नोंदणी कशी व कुठे करावी, प्रस्ताव सादर करण्याचे अर्जांचे नमुने, शासनाच्या साधन सामग्री योजना इत्यादींची सविस्तर माहिती मिळू शकेल.

आज एकविसाव्या शतकाने ग्रंथालयापुढे फार मोठी आव्हाने उभी केली आहेत. माहिती तंत्रज्ञानातील घोडदौड व माहितीचा विस्फोट यांना सामावून घेऊन ग्रंथालयांना टिकवून ठेवायचे आहे, पुढे न्यायचे आहे. पुस्तकांचे व ग्रंथालयांचे महत्त्व या झंझावातापुढेही टिकून राहील अशी जगभराच्या वाचकांची, विचारवंतांची व ग्रंथपालांची आशादायक धारणा आहे यांची नोंद पालघर तालुक्याने घेणे अत्यावश्यक आहे.

**प्रा. अशोक रा. ठाकूर**
कार्यकारिणी सदस्य,
ठाणे जिल्हा सार्वजनिक ग्रंथालय, संघ

•••

# 'झालाच पाहिजे !' आचार्य अत्रे यांचे घणाघाती लेख

*'झालाच पाहिजे' हे एक वाचनीय व संदर्भासाठी उपयुक्त असे पुस्तक. या पुस्तकाचे परीक्षण देत आहोत.*

*- संपादक*

संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीच्या दरम्यान ही मागणी जागती ठेवण्यासाठी आचार्य अत्रे यांनी आपले अमोघ वक्तृत्व व जहाल लेखणी यांचा शस्त्रासारखा उपयोग केला होता. महाराष्ट्राच्या राजकीय इतिहासामध्ये या चळवळीचे स्थान अतिशय महत्त्वपूर्ण आहे. 'नवयुग' साप्ताहिकातील अत्र्यांचे लेखन १९५६ मध्ये त्यांनी काढलेल्या 'मराठा' या दैनिकातील लेखन हे या चळवळीचा अभ्यास करण्याच्या दृष्टीने महत्त्वाचे संदर्भ आहेत. परंतु एकूणच अभ्यासाबद्दल व विशेषत: वृत्तपत्रीय लेखांच्या अभ्यासातील आयोगाबद्दल आपल्या समाजात कमालीची अनास्था आहे. त्यामुळे कित्येक विषयांमधील महत्त्वाचे साधन ठरू शकतील, अशी नियतकालिके व वृत्तपत्रे काळाच्या ओघात नाहीशी होतात, त्यांची उपयुक्तता हा उपेक्षित विषय ठरतो. परिणामत: ग्रंथांची निगा राखणारी मोठाली ग्रंथालये ही कालिक महत्त्वाचे संदर्भ पुरविण्यास असमर्थ ठरतात. या पार्श्वभूमीवर अत्र्यांच्या नवयुग साप्ताहिकातील लेखनाची हजारो पाने चाळून त्यांचा सखोल अभ्यास करून या लेखांचे संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीच्या संदर्भात असणारे महत्व लक्षात घेऊन संपादित स्वरुपात उपलब्ध झालेला आचार्य अत्रे यांचा 'झालाच पाहिजे' हा ५२ लेखांचा संदर्भ ग्रंथ मराठी संदर्भ ग्रंथांमध्ये मोलाची भर ठरेल असा आहे.

महाराष्ट्राच्या सामाजिक, सांस्कृतिक, साहित्यिक व राजकीय जीवनावर अष्टपैलू व्यक्तिमत्वाच्या आचार्य अत्रे यांचा प्रभाव हे एक आश्चर्यच म्हणावे लागते. त्यांचे ग्रंथ, पाने उपलब्ध असणारे साहित्य अभ्यासकांना सहज मिळू शकते. परंतु संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीमध्ये त्यांनी त्यांच्या 'नवयुग' साप्ताहिकातून व 'मराठा' दैनिकातून जे विचारमंथन केले. त्या वेळच्या राजकीय पुढाऱ्यांवर घणाघाती टीका करून 'झालाच पाहिजे' या आग्रही भूमिकेतील आग्रहीपणा टिकवला ते वृत्तपत्रीय लेखन आज अभ्यासकांना सहजपणे उपलब्ध नाही. त्या दृष्टीने त्यांच्या या लेखनाचे परिशीलन करून 'डिंपल प्रकाशन' या संस्थेने हा ग्रंथ सिद्ध केला व महत्त्वाचे काम केले. या ग्रंथातील लेखांचे अभ्यासपूर्ण संपादन करताना श्री. प्रदीप कर्णिक लिहितात, '१९४६ च्या नवयुगच्या अंकाची फाईल उपलब्ध नाही.' (पृ.२०) ही नोंद त्यांना घ्यावी लागणे हाच वृत्तपत्रीय लेखनाकडे बघण्याचा उदासीन दृष्टिकोण अधोरेखित करणारा पुरावा आहे.

या ग्रंथामध्ये 'नवयुग' साप्ताहिकाप्रमाणेच आचार्य अत्रे यांच्या पंच खंडात्मक 'कऱ्हेचे पाणी' या आत्मचरित्रामधील मजकुराचाही समावेश आहे. परंतु 'मराठा'मधील लेखन यात नाही. पृ. ४६ वर श्री. कर्णिक म्हणतात, 'अत्रे आणि त्याचं 'नवयुग' साप्ताहिक याचं योगदान जसं पाहिलं तसच 'मराठा' दैनिकाचंही योगदान तपासणे उचित होईल.' मात्र मराठातील लेखन यात आलेलं नाही. या ५२ लेखांची विभागणी 'संयुक्त महाराष्ट्र आंदोलनापूर्वी' (१४ लेख), संयुक्त महाराष्ट्र आंदोलनात आरंभ (१३ लेख), संयुक्त महाराष्ट्राचा आंदोलनाचा धडाका (१० लेख) संयुक्त महाराष्ट्र निर्मितीच्या दिशेने (६ लेख) व संयुक्त महाराष्ट्राची निर्मिती (९लेख) अशा ५ विभागांमध्ये केली आहे. अत्र्यांच्या वृत्तपत्रीय शैलीची

काही खास वैशिष्ट्ये होती. त्या या लेखांमध्ये विचारांची स्पष्टता, घणाघाती प्रहार हे विशेष तर आहेतच पण त्यांच्या लेखाची शीर्षकेही खूप बोलकी होती. किती गणना करशील रे यशवंता (पृ. १२७), मोरारजीचा यशवंत अवतार (पृ. २५७) चौदावे रत्न (पृ. ३४८) ही लेखांची शीर्षके याचे उदाहरण आहे. पण ज्या अनेक लेखाचा उल्लेख कर्णिकांच्या प्रास्ताविकात येतो त्यांची शीर्षकही 'अत्रे स्पर्श' दाखविणारी आहेत. या ग्रंथाचे मुखपृष्ठ, आचार्य अत्रे यांचे व्यंगचित्र श्री. श्रीकांत ठाकरे यांनी काढलेले आहे. 'नवयुग' साप्ताहिकातील ठाकरे, मावळा या नावाने आलेली बाळासाहेब ठाकरेंची अप्रतिम व्यंगचित्रे, श्रीकांत ठाकरे यांची व्यंगचित्रे ग्रंथात समाविष्ट करण्यात आलेली आहेत, हे विशेष महत्त्वाचे आहे. या व्यंगचित्रांबद्दल प्रस्तावनकार लिहितात, 'व्यंग चित्रे नुसती अंकात पडून राहत नाहीत, तर जनसामान्यांच्या मुखातून ती अधिक वेगाने सर्वदूर पसरतात.' (पृ. ४४) हे खरेच आहे. शिवाय अशा ऐतिहासिक महत्त्व असणाऱ्या संदर्भांचा अभ्यास करताना अभ्यासकाच्या विचारांना एक वेगळे परिमाणही या व्यंगचित्रातून मिळत असते. उदा. मोरारजींच्या पोलिसाचा राक्षसी गोळीबार या लेखात पृ. १२३ वर असणारे श्रीकांत ठाकरे यांचे 'त्याच महात्माजींच्या भंगी कॉलनीत' (पूर्वी दिसणारे दृश्य व आता दिसणारे गोळीबाराचे चित्र) हे व्यंगचित्र या गोळीबारात एकंदर पंधरा निरपराधी माणसांचे मोरारजींनी बळी घेऊन आपल्या दास्याकांडाचा मुहूर्त केला हा लेखाचा आशय प्रभावीपणे सूचित करत. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीच्या कालखंडात अनेक लहान-मोठ्या वृत्तपत्रांतून व्यंगचित्रे आणि असणार ती एकत्रित करून एक चांगला ग्रंथ सिद्ध करता येऊ शकतो.

या ग्रंथात असणारी ३९ पानांची दीर्घ प्रस्तावना अनेक दृष्टींनी अभ्यासण्यासारखी आहे. अत्र्यांच्या एकूण चरित्रातील हा चळवळीचा कालखंड, त्यांच्या पूर्वजीवनाचा संदर्भ, त्यांच्या व्यक्तिमत्त्वामधील अथक असे झपाटलेपण, चळवळीतील प्रत्येक लहान-सहान घटनांचे 'नवयुग' मधील लिखाणाच्या आधारे पुरावे देत केले विश्लेषण आणि हा अभ्यास मांडत असताना तटस्थ राहूनही भाषेत असणारा ओघ या सर्वांमुळे प्रस्तावना महत्त्वाची ठरलेली आहे. 'प्रारंभ आणि पूर्तता' हे शीर्षक असणाऱ्या या प्रस्तावनेमुळे ग्रंथाचे अभ्यासमूल्य, संदर्भ मूल्य विलक्षण वाढले आहे. किंबहुना 'नवयुग'च्या कर्णिकांनी सांक्षेपाने केलेला हा अभ्यास व त्या आधारे लिहिलेली ही प्रस्तावना वृत्तपत्रामधून प्रकाशित झालेल्या लेखनाच्या अभ्यासाचे उत्तम उदाहरण ठरावी. विशेषत: आपल्या समाजातील ज्या अनास्थेचा वर उल्लेख आलेला आहे. त्या पार्श्वभूमीवर अशा संशोधनपर प्रस्तावनांना अतिशय महत्त्व आहे.

'झालाच पाहिजे !' या आग्रही शब्दांना त्या अभूतपूर्व दिवसांमध्ये मंत्रासारखे अमोघ सामर्थ्य प्राप्त झालेले होते, हा त्या वेळच्या तीन कोटी मराठी माणसांचा अनुभव आहे. 'झालाच पाहिजे !' मधला जो 'च' आहे, त्या 'च' ने त्यांच्या जिव्हारामध्ये अगदी सुरी खुपसावे असे त्यांना दु:ख होते. (त्यांच्या म्हणजे यशवंतराव चव्हाण व शंकरराव देव) (पृ. १३२) असे अत्रे लिहितात त्यावेळी 'च' मधील जोर वेगळ्या संदर्भात जाणवल्याशिवाय रहात नाही. अत्र्याचा या चळवळीतील वाटा सिंहाचा होता. श्री. श्रीकांत ठाकरे यांनीही मुखपृष्ठातून सिंहाच्या रेखाटनातून हे सत्य अचूकपणे नोंदले आहे. याचे कारण अत्र्यांचे एकूणच मराठी जीवनावर विलक्षण प्रेम होते. 'उद्या जर माझी समाधी बांधायची झाली तर तिच्यावर एकच वाक्य लिहा की, 'हा मनुष्य मूर्ख असेल, प्रमादशील असेल पण कृतघ्न नव्हता !'

या लेखांचे ऐतिहासिक महत्त्व लक्षात घेता, 'नवयुग'च्या ज्या अंकामधील लेखांची निवड केली गेली त्या अंकाचा प्रकाशन दिनांक संबंधित लेखांच्या खाली येणे मात्र गरजेचे होते. तसेच 'कऱ्हेचे पाणी'चे खंड व पृष्ठ संदर्भही उद्धृत केले जाणे आवश्यक होते. मराठी ग्रंथामध्ये

सर्वसामान्यत: आढळणाऱ्या उणीवा म्हणजे निर्देश सूची नसणे व संदर्भ ग्रंथांची यादी नसणे. 'झालाच पाहिजे' सारख्या सर्व दृष्टींनी उल्लेखनीय ग्रंथात ही उणीव राहू नये, असे वाटते. एकंदरीने हा ग्रंथ 'वाचलाच पाहिजे' ('च' व जोर!) या सदरात मोडणारा आहे. अत्र्यांच्या साहित्याच्या अभ्यासास त्यामुळे परिपूर्णता येईल.

प्रा. मोहन पाठक
ठाणे

ग्रंथाचा तपशील

'झालाच पाहिजे!' - प्रल्हाद केशव अत्रे

संपादन : श्री. प्रदीप कर्णिक

डिंपल प्रब्लिकेशन, वसई रोड.

पृष्ठे - ३५२, मूल्य : रु. २५०/-




मा. संपादक
'दिशा'

माझी मुलाखत असणारा दिशाचा अंक मिळाला. अंक वाचला. अंकातील लेखाचा दर्जा, अंकाचे बाह्य स्वरूप (गेटअप), मुद्रण या सर्व दृष्टीने अंक अतिशय उत्तम आहे.

शिक्षण संस्था इतके दर्जेदार नियतकालिक देऊ शकते हे विशेष आहे. अधिकाधिक वाचकांपर्यंत आपला अंक पोहचवण्याची गरज आहे.

आपण करीत असलेल्या कार्यास दाद द्यावी, असे वाटते, म्हणून हा पत्र प्रपंच! आपल्या कार्यास मन:पूर्वक शुभेच्छा!

आपला स्नेहांकित

(अशोक नायगावकर)

# पूर्वीची मजा...

बऱ्याच वर्षांनी आम्ही शाळेतल्या मैत्रिणी भेटलो. जुन्या आठवणी निघाल्या. शाळेतल्या गंमीत-जमती, लहानपणी एकत्रितपणे सहलीला गेलो तेव्हा कशी मजा केली. एकत्र डबा खाल्ला. अभ्यास कसा केला, शिक्षकांच्या आदरयुक्त धाकाच्या, त्यांच्या शिस्तीच्या आठवणी रंगल्या, वेळेचे भान आले आणि जड अंत:करणाने एकमेकांचा निरोप घेत शेवटी म्हणालो, 'आता काही पूर्वीची मजा राहिली नाही !'

दुसरा प्रसंग असाच ! जुन्या चाळीतले काका-काकू भेटले, 'कशी आहेस गं?' 'आता सध्या काय करतेस?' वगैरे विचारपूस करून झाली. पूर्वी कसे आपण एकत्र जेवायचो, एकमेकांच्या घरात कधीही जायचो, इत्यादी आठवणी निघाल्या आणि शेवटी निरोप घेताना म्हणाले, 'अगं, आता चाळीत पूर्वीची मजा नाही राहिली !'

असेच जुन्या ऑफिसमधले सहकारी एकदा भेटले. पूर्वी आपण कार्यालयात कसे एकजुटीने काम करत होतो. एकमेकांच्या कामाच्या समस्या सोडवून देत होतो. सहली काढायचो, एकमेकांच्या घरच्या समस्या आपल्याच वाटायच्या, नवीन वर्ष साजरे करताना कशी धमाल यायची वगैरे वगैरे ! आणि ते सहकारी शेवटी निरोप घेताना म्हणालेच, 'पण बाई, आता ऑफिसमध्ये पूर्वीची मजा नाही राहिली...!'

लग्नप्रसंग, हळदीकुंकू, सण-समारंभ अशा अनेक वेगवेगळ्या प्रसंगात वा वेगवेगळ्या ठिकाणी हे शब्द ऐकू येतात आणि मग मी विचार करू लागते हे असे का बरे? बऱ्याच वेळेस असेही वाटते की, हे जे पिढीतले अंतर व समाज बदलतोय म्हणतात त्यामुळे असे होत असेल का? कित्येकदा तर तरुण पिढीदेखील वैफल्यग्रस्त वाटते, त्यांच्यात एकमेकांबद्दल ओढ किंवा भावनिक गुंतवणूक कमी आढळते. त्याचमुळे का आमच्या पिढीला पूर्वीची मजा आता नाही, असे वाटते? 'वापरा आणि फेका' याच तत्वावरच 'कामापुरते या आणि विसरा' असे चालले आहे, असे म्हणावे तर बऱ्याच ठिकाणी सहली, गॅदरिंग, भेटकार्डांचा तर सुळसुळाट दिसतो तो नुसता देखावाच आहे की, चार्वाक तत्वज्ञानाप्रमाणे, 'बिअरच्या पेल्यात आजचा क्षण लुटा-कशाही तऱ्हेने' चा परिपाक आहे ? धावपळीच्या रहाटगाड्यात आणि घड्याळाच्या काट्यावर चालणाऱ्या दिनक्रमात आपण कित्येकवेळा माणुसकीही विसरत चाललो आहोत, म्हणूनच पूर्वीची मजा नाही.. असं वाटतं का?

पूर्वी सर्व विद्यार्थ्यांचा अभ्यास नीट व्हावा, सर्वजण परीक्षेत पास व्हावेत म्हणून मेहनत घेणारे शिक्षक, नि:स्वार्थीपणाने व पैशाचा मोह न बाळगता शाळेच्या वेळेखेरीज शिकवणारे शिक्षक आज फारसे दिसत नाहीत. क्लास, ट्यूशनचे बोकाळलेले प्रस्थ वाढले आहे, म्हणून असे वाटते कां? की पूर्वी एकमेकांवर हक्काने रागवणारे, एकमेकांना नि:स्पृहपणे मदत करणारे, एखादा नवीन पदार्थ चांगला झाला की आवर्जून घरी आणून देणारे शेजारी राहिले नाहीत, म्हणून असे वाटते? की पैसा मिळवण्याच्या हव्यासापोटी नीती-अनितीची चाड राहिली नाही म्हणून असे वाटते? दु:ख आणि सुख न सांगताच समजणारे आणि मदतीला धावून येणारे लोक फारच कमी होत चालले आहेत, ही वस्तुस्थिती आणि एकमेकांत सुमरसून न जाता, वाढलेला स्वार्थीपणा, एकजुटीचा अभावे संकुचित कुटुंब प्रणालीची आस, पैशासाठी विदेशात धाव घेण्याची वृत्ती भ्रष्टाचारी राजकारणी आणि त्याचा दूरगामी होणारा परिणाम म्हणून रोजच्या पेपरात येणाऱ्या खून, दरोडे व वृद्धांच्या होणाऱ्या हल्ल्यामुळे भयग्रस्त मनातून येणारे हे उद्गार आहेत? कोणास ठाऊक?

**वेदवती हब्बु**

शैलज बिल्डिंग, तळमजला, प्रो.वि. देशपांडे मार्ग,
शिवाजी पार्क, रोड नं.४, दादर, मुंबई - ४०० ०२८.
फोन : २४४५ ६८८२

# परिसर वार्ता

## शिक्षण पद्धतीबाबतचे मोठ्यांचे निर्णय मुलांच्या बुद्धीला मारक

**- डॉ. डी. बी. फाटक**

"सर्वसाधारणपणे लहान मुलांच्या ग्रहण क्षमतेची आपल्याला कल्पना नसते. त्यांना संपूर्णतः नवीन असलेली मातृभाषा ते केवळ आसपासच्या वातावरणातून चार-पाच वर्षांच्या कालावधीत सहज शिकतात. या क्षमतेचा आपण आदर करायला हवा. त्यातूनच शिक्षण पद्धतीकडे पहायला हवे. मात्र प्रौढांना त्यांच्याबद्दल काय वाटते यानुसारच आपण निर्णय घेत असून ते मुलांच्या निरागसतेला आणि बुद्धीला मारकच ठरते." असे प्रतिपादन पवई आयआयटीमधील माहिती तंत्रज्ञान विभागाचे संचालक डॉ. डी. बी. फाटक यांनी ठाण्यात बोलताना केले.



*चर्चासत्राचे उद्घाटन करताना क्रिस्तीन मिलर, अॅण्ड्रयु मटर, सुधाकर आगरकर, डॉ. वा. ना. बेडेकर, डॉ. विजय बेडेकर*

'लीग फॉर एक्सचेंज ऑफ कॉमनवेल्थ टीचर्स' या राष्ट्रकुल संघाच्या उपक्रमानुसार ठाणे भेटीवर आलेल्या ब्रिटीश शिक्षकांशी वैचारिक देवाण-घेवाण करण्यासाठी १७ फेब्रुवारी रोजी महाविद्यालयातील थोरले बाजीराव पेशवे सभागृहात एका चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. या चर्चासत्रात प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. फाटक उपस्थित होते. आपल्या भाषणात त्यांनी अनेक उदाहरणे देत शिक्षण आणि सृजनशीलता, शिक्षण आणि यशाचे मोजमाप याविषयी विचार व्यक्त केले. देशी आणि परदेशी पाहुण्यांना तो अतिशय चांगला नजराणाच ठरला.

या भेटीचे यजमानपद सांभाळणाऱ्या प्राच्यविद्या अभ्यास संस्थेचे अध्यक्ष डॉ. विजय बेडेकर यांनी आपल्या भाषणात शिक्षण प्रणालीबद्दल गांभीर्याने विचार करण्याची गरज व्यक्त केली. वर्गाच्या चार भिंतीत शिक्षण मिळत नाही. खरे शिक्षण त्याबाहेरच मिळते, असे सांगून ते पुढे म्हणाले, 'आपल्याकडे साधनांची कमतरता असल्यामुळे डोळे बंद करून पाश्चात्य अनुकरण करणे चुकीचे ठरेल. भारतीय पद्धतीनेच आपल्याला या समस्येवर उपाय शोधायला हवा.'

ब्रिटीश शिक्षक प्रतिनिधी मंडळाचे प्रमुख अॅण्ड्रयू मटर यांनी त्यांच्या शिक्षणपद्धतीत सांस्कृतिक घटकांचे विशेषत्वाचे सादरीकरण केले. ब्रिटीश शिक्षकांनी तेथील पद्धतीबद्दल माहिती दिली. एका वर्गातील विद्यार्थ्यांची कमी संख्या (जास्तीत जास्त ३०) हे तेथील वैशिष्ट्य म्हणता येईल. मात्र काही शाळांमध्ये प्राथमिक विद्यार्थ्यांना गृहपाठ दिला जात नाहीच, पण अगदी पुस्तकेदेखील घरी दिली जात नाहीत, असे यावेळी सांगण्यात आले. लीगच्या वरिष्ठ अधिकारी क्रिस्तीन मिलर यादेखील या प्रतिनिधीमंडळात सामील झाल्या असून २००० साली सादर झालेल्या शिक्षणावरील श्वेतपत्रिकेबद्दल त्यांनी माहिती दिली.

चर्चासत्रातील दुपारच्या सत्रात बडोद्याच्या स्वाती बेडेकर यांनी लहान शिशूपासून १२वीच्या मुलांपर्यंत खेळण्यांच्या माध्यमातून शिक्षण देण्याच्या तंत्राची दृकश्राव्य माध्यमातून ओळख करून दिली. गुजरातमध्ये या तंत्राचा

मोठ्या प्रमाणावर अवलंब होत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. ठाण्यातील सरस्वती मराठी, ए.के. जोशी, मो.ह. विद्यालय, बेडेकर शाळेतील अनेक शिक्षक-शिक्षिका चर्चासत्रात उपस्थित होते. त्यांनीही पाहुण्यांकडून बरीच माहिती जाणून घेतली.

## बांदोडकरच्या माजी विद्यार्थी संघाचा अभिरूप मुलाखतींचा कार्यक्रम

बांदोडकर विज्ञान महाविद्यालयाच्या अनुबंध या माजी विद्यार्थी संघटनेने विद्यमान तृतीय वर्ष विज्ञान या वर्गातील विद्यार्थ्यांसाठी अभिरूप मुलाखतींचा एक कार्यक्रम शनिवारी सकाळी थोरले बाजीराव पेशवे सभागृहात आयोजित केला होता.

माजी विद्यार्थी संघटनेचे संयोजक प्रा. मोहन पाठक यांनी माजी विद्यार्थी संघाचे कार्य कसे महत्त्वाचे असते याविषयी प्रास्ताविक करून या कार्यक्रमासाठी तज्ज्ञ म्हणून उपस्थित असणारे गिरीश तिळवे (एक्साईज अधिकारी), सुनिल गोगटे (मार्केटिंग तज्ज्ञ), उदय निरगुडकर (उपाध्यक्ष, आपटेक), डॉ. संजय देशमुख (संशोधक शास्त्रज्ञ), शशांक रसाळ (एसीसी मधील वरिष्ठ अधिकारी), या माजी विद्यार्थ्यांचा परिचय करून दिला. महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. माधुरी पेजावर यांनीही माजी विद्यार्थी संघाच्या उपक्रमाविषयी विद्यार्थ्यांना माहिती दिली. यानंतर वरील सर्व अनुभवी विद्यार्थ्यांनी तृतीय वर्ष विज्ञान या वर्गातील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

यानंतर मुलाखतींचा तंत्रे याविषयी उदय निरगुडकर यांनी सुमारे पाऊण तास पॉवर पॉईंट प्रेझेंटेशन करून विद्यार्थ्यांना व्याख्यान दिले.

प्रत्यक्ष अभिरूप मुलाखतीसाठी विद्यार्थ्यांचे चार गट करण्यात आले होते. या गटास उदय निरगुडकर, गिरीश तिळवे, शशांक रसाळ व सुनिल गोगटे यांनी प्रत्यक्ष मुलाखती घेतल्या.

सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचलन गिरीश तिळवे यांनी केले तर आभार प्रा. मोहन पाठक यांनी मानले. कार्यक्रमासाठी प्रा. प्रविण गुरव, उमेश ललित, प्रशांत पै, विकास शिंदे या माजी विद्यार्थ्यांनी तसेच प्रा. अभिजित काळे व डॉ. मनोहर न्यायते यांनी विशेष मेहनत घेतली. कार्यक्रमास प्रा. वर्षा महाजन, प्रा. आर. एस्. पोद्दार, डॉ. पुनम कर्वे, प्रा. सी. मेश्राम आदी सहकारी उपस्थित होते. महाविद्यालयाचे प्राचार्य सी. जी. पाटील यांचे या कार्यक्रमासाठी मार्गदर्शन लाभले.

## तंत्रनिकेतन- वार्ता

दि. १५ फेब्रुवारीस 'थोरले बाजीराव पेशवे सभागृहात ''पॉलिझिन' या वार्षिकाचे प्रकाशन प्रमुख पाहुणे डॉ. उल्हास कोल्हटकर यांच्या हस्ते संपन्न झाले.




*डावीकडून प्राचार्य मुजुमदार, श्री. व्ही. आर. सावंत, डॉ. उल्हास कोल्हटकर, डॉ. वा. ना. बेडेकर*

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना डॉ.कोल्हटकर म्हणाले, 'वास्तवाचे भान ठेऊन विद्यार्थ्यांनी समतोल साधावा.' याशिवाय शिक्षणपद्धतीवर त्यांनी थोडक्यात त्यांचा दृष्टिकोन स्पष्ट केला. विद्यार्थ्यांनी यशस्वी होण्यासाठी काही सूत्रे लक्षात ठेवावी असेही त्यांनी सांगितले.

या कार्यक्रमास वि. प्र. मंडळाचे अध्यक्ष डॉ. वा.

ना. बेडेकर, उपाध्यक्ष श्री. करंदीकर व मंडळाचे इतर माननीय सभासद उपस्थित होते. तसेच विशेष निमंत्रित महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाचे सहाय्यक सचिक श्री. व्ही. आर. सावंत, प्राचार्य सी.श्री. मुजुमदार, उपप्राचार्य श्री. नायक हे ही उपस्थित होते.

कार्यक्रमाचा आरंभ दीपप्रज्वलन व ईशस्तवनाने झाला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अविनाश गावडे, अमेय ओक, नरेश चौधरी आणि पराग दावडा या विद्यार्थ्यांनी केले होते.

प्राचार्य सी.श्री. मुजुमदार यांनी तंत्रनिकेतनाच्या वार्षिक अहवाल सादर केला. यानंतर व्ही. आर. सावंत यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना शैक्षणिक पारितोषिके वितरित करण्यात आली. त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले व परीक्षेसाठी शुभेच्छाही दिल्या. पॉलिझिनचे प्रकाशन डॉ. उल्हास कोल्हटकर यांच्या हस्ते झाले व यावेळी 'पॉलिझिन' या वार्षिकातर्फे जे उपक्रम आयोजित केले होते त्याचा बक्षिस समारंभ ही त्यांच्या हस्ते झाला. महाराष्ट्र शासनातर्फे तंत्रशिक्षणाच्या सदस्यपदी प्राचार्य सी.जी. मुजुमदार यांची नियुक्ती झाल्याने मंडळाचे अध्यक्ष डॉ. वा. ना. बेडेकर यांच्या हस्ते त्यांचा तंत्रनिकेतना तर्फे सत्कार करण्यात आला.

विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष डॉ. वा. ना. बेडेकर यांनीही त्यांचे विचार मांडून विद्यार्थ्यांशी सुसंवाद साधला.

संपादिका सौ. पाध्ये यांनी आभार प्रदर्शन केले. कार्यक्रमाची सांगता देशभक्तीपर गीताने झाली. या कार्यक्रमास विद्यार्थी व शिक्षक आणि शिक्षकेतर वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## मुजुमदारसरांचे अभिनंदन

महाराष्ट्र शासनाच्या अधिनियम (१९९७) क्रमांक जीटीआय २००२/(४५३/०२) / तांरी-२ व महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ १९९७ च्या कलम ७ अ नुसार, विद्या प्रसारक मंडळाच्या तंत्रनिकेतनाचे प्राचार्य श्री. सी. श्री. मुजुमदार यांची तंत्रशिक्षणाच्या सदस्य पदी नेमणूक करण्यात आली आहे



श्री. सी. श्री. मुजुमदार

विना अनुदानित तंत्रनिकेतनाचे प्राचार्य म्हणून ही नेमणूक करण्यात आली आहे.

प्राचार्य श्री. सी. श्री. मुजुमदार गेली १७ वर्षे सदर संस्थेचे प्राचार्य म्हणून कार्यरत आहेत.

## तंत्रनिकेतन वार्ता

दरवर्षी प्रमाणे विद्याप्रसारक मंडळाच्या तंत्रनिकेतनाच्या तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांनी प्रोजेक्टचे प्रदर्शन २८ फेब्रु. २००३ रोजी तंत्रनिकेतनात भरविले होते.

हे प्रदर्शन पाहणे म्हणजे विद्यार्थ्यांच्या कल्पकतेचा एक सुंदर अनुभवच असतो. या प्रदर्शनासाठी श्री. जे. जी. महाले, एक्झीक्युटीव्ह इंजिनिअर M.S.R.D.C. श्री गिरीश दंडिगे (Tata Infotech) व श्री. नरेंद्र देशपांडे (Astron Electric Corp.) हे विशेष निमंत्रित म्हणून उपस्थित होते.

विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष डॉ. वा. ना. बेडेकर व उपाध्यक्ष श्री. करंदीकर यांनीही उपस्थित राहून विद्यार्थ्यांना प्रोत्साहन दिले.

तृतीय वर्ष इलेक्ट्रॉनिक्सचे 'हाऊस सिक्युरिटी सिस्टीम विथ लेझर बीम' 'डिजिटल रोटामीटर', 'व्हेइकल

सिक्युरिटी, हार्ट बीटस्' हे प्रोजेक्टस उल्लेखनीय होते.

इलेक्ट्रिकल मध्ये 'इलेक्ट्रॉमॅग्नेटिक क्लॉक' व 'इस्केलेटर' 'इन्स्टॉलेशन ऑफ टनेल वायरिंग' हे उत्तम प्रोजेक्ट होते.

इन्स्टुमेंटेशनचे प्रोजेक्ट 'सनब्लाईंड कंट्रोल' 'हाऊस सिक्युरिटी', 'साऊंड प्रेशरमीटर' 'एलव्हीडिटी' आणि 'डिजिटल फ्ले मीटर' असे होते.

प्रोजेक्ट प्रत्यक्ष मॉडेलच्या स्वरूपात वर्किंग होत असताना पाहणे याचा आनंद वेगळाच होता. शिवाय विद्यार्थी हा प्रोजेक्ट कसा बनविला व त्याचा उपयोग कसा होतो याचे प्रात्यक्षिके करून दाखवित होते. एकंदर प्रोजेक्ट खूप होते पण त्यात उदाहरणादाखल काही प्रोजेक्टची नावे दिलेली आहेत.

प्रोजेक्ट पाहताना प्रोजेक्ट गाईडचे मार्गदर्शन, विद्यार्थ्यांनी घेतलेले कष्ट जाणवत होते. प्राचार्य श्री. मुजुमदार व उपप्राचार्य श्री. नायक यांनी स्वत: प्रोजेक्ट बघून त्याबद्दल समाधान व्यक्त केले.

**'ठाणे शहरातील नैसर्गिक जलस्रोतांचे संवर्धन व त्यांच्या पाण्याचा वापर' - चर्चासत्र**

ठाणे परिसर व जिल्ह्यामध्ये या वर्षी अनियमित व कमी पाऊस झाल्यामुळे तसेच ठाण्याची लोकसंख्या प्रचंड प्रमाणात वाढल्यामुळे ठाण्याला पाणी टंचाईचे संकट भेडसावत आहे. या पार्श्वभूमीवर ठाणे शहरातील नैसर्गिक जलस्रोतांचे संवर्धन व त्यांचा वापर या विषयावर सर्वांच्या जिव्हाळ्याच्या विषयावर 'हरियाली' व 'बा.ना.बांदोडकर विज्ञान महाविद्यालयाने' दि. २/३/२००३ रोजी विद्याप्रसारक मंडळाच्या थोरले बाजीराव पेशवे सभागृहात एक दिवसाचे चर्चासत्र आयोजित केले होते. चर्चासत्राचा कार्यक्रम सकाळी ९ वा. सुरू झाला. स्वागताध्यक्ष प्राचार्य सी. जी. पाटील यांनी उपस्थितांचे स्वागत केले. आपल्या स्वागतपर भाषणात त्यांनी चर्चासत्राचे उद्दिष्ट सांगितले व नैसर्गिक जलस्रोतांचे संवर्धन करून त्यांना प्रदूषण मुक्त ठेवण्याची गरज असल्याचे प्रतिपादन केले. कार्यक्रमासाठी विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष डॉ. वा.ना.बेडेकर व रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनीचे संचालक श्री. विनय सहस्रबुद्धे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. श्री. विनय सहस्रबुद्धे यांनी दीप प्रज्ज्वलन करून चर्चासत्राचे उद्घाटन केले.

'हरियाली'चे अध्यक्ष श्री. पूनम सिंघवी यांनी हरियालीचे कार्य सांगून उपस्थितांचे स्वागत केले. उपाध्यक्ष श्री. हेमंत गुप्ते यांनी हरियालीचे दगडाच्या खाणींचे रुपांतर सुंदर तळ्यांमध्ये कसे केले ते दाखवून ठाण्यातील अन्य नाल्यांवर व ओहोळावर बांध घालून पाणी कसे अडविता येईल व त्याचा कसा वापर करता येईल या संबंधी सविस्तर विवेचन केले. श्री. विनय सहस्रबुद्धे यांनी उद्घाटनपर भाषणात आजची शहरे बिनचेहऱ्याची बनत चालल्याबद्दल खंत व्यक्त केली व जलस्रोतांचे महत्त्व सांगून चर्चासत्राला शुभेच्छा दिल्या. डॉ. वा. ना. बेडेकर यांनीही ठिकठिकाणी पाण्याचा प्रश्न ७०-७५ वर्षांपूर्वीपासून कसा आहे व त्यावर उपाय योजना करण्यासाठी पूर्वी ही कसे प्रयत्न होत ते सांगून पाणी वाया जाऊ नये यासाठी ठोस उपाय करण्याची नितांत गरज असल्याचे सांगितले. उद्घाटन सोहळा ११ वाजता संपन्न झाला. सोहळ्याचे सूत्रसंचालन सौ. मनीषा टिळक यांनी उत्तम प्रकारे केले.

दुपारी १२ ते १ ।।। या वेळात बी.एम्.सी.चे निवृत्त मुख्य अभियंता श्री. सुरेश पाटणकर, बा. ना. बांदोडकर महाविद्यालयातील प्रपाठक डॉ. नागेश टेकाळे व प्रा.नामदेव मांडगे व ठाणे महानगरपालिकेचे मुख्य अभियंता श्री. के.डी.लाला या तज्ज्ञांची प्रमुख भाषणे झाली. श्री. आर. जी. कुलकर्णी या सत्राचे अध्यक्ष होते. श्री. पाटणकर यांनी निरनिराळ्या जलस्रोतांपासून किती पाणी मिळू शकेल व त्यासाठीचा खर्च किती येईल, याचा अंदाज व्यक्त केला. डॉ. नागेश टेकाळे यांनी ठाण्यातील तळ्यांची दुर्दशा दाखवून

ती वाचविण्यासाठी काय केले पाहिजे हे सांगून त्यांचा नियमीत उपसा करून ती स्वच्छ ठेवली पाहिजेत, हे प्रतिपादन केले. प्रा. मांडगे यांनी ट्यूबवेल पावसाच्या पाण्याने कशा भरता येतील व ते आर्थिक दृष्ट्या कसे शक्य होईल, हे आकृत्यांच्या सहाय्याने समजावून सांगितले. श्री. लाला यांनी ठाणे म.न.पा.पाण्याच्या प्रश्नावरील करीत असलेले प्रयत्न प्रभावीपणे समजावून सांगितले.

सदर कार्यक्रमाच्या दृकश्राव्य माध्यमासाठी प्रा.कालष व प्रा.पारिया यांनी संयोजन व सहकार्य केले तर सौ. स्मिता जोग यांनी सूत्रसंचालन केले. भोजनाच्या दुपारच्या चर्चासत्रात भाग घेणाऱ्या सर्वांनी तज्ज्ञांच्या भाषणांवर व पाणी वाचविणे, जलस्रोताचा वापर इत्यादी बाबींवर गटवार चर्चा केली. सहभागी लोकांची एकूण ५ गटांत विभागणी केली होती. प्रत्येक गटप्रमुखाने आपले अहवाल श्री विकास मायदेव (सचिव, हरियाली) यांना सादर केले. गटवार चर्चासत्राचे अध्यक्षपद प्राचार्य ए.डी.ओक यांनी भूषविले.

गटवार चर्चेनंतर चहापान होऊन तद्नंतरच्या शेवटच्या सत्रात श्री. मायदेव यांनी विविध गटांनी मांडलेले प्रश्न तज्ज्ञांना विचारले व तज्ज्ञ श्री. पाटणकर, डॉ. टेकाळे व श्री. मांडगे यांनी शंका निरसन केले. प्राचार्य ओक यांनी चर्चासत्राचे निष्कर्ष संक्षेपाने सांगितले. प्राचार्य टिळक यांनीही हरियालीच्या कार्याचा विशेष गौरव करून चर्चासत्राचे निष्कर्ष व त्या अनुषंगाने पुढे करण्याच्या कामांची दिशा याबद्दल विवेचन केले व कृती आराखडा सांगितला. या सत्राचे प्रमुख पाहुणे श्रीयुत गोखले यांनी या उपयुक्त चर्चासत्राबद्दल हरियाली व बा.ना.बांदोडकर महाविद्यालयाचे अभिनंदन केले. आभार प्रदर्शनानंतर कार्यक्रम संपन्न झाला.

सदर चर्चासत्रासाठी उपस्थितांमध्ये न्यायमूर्ती राजाभाऊ गवांदे, डॉ. सौ. कुसुम गोखले, डॉ. पारटकर, डॉ. कुर्वे, डॉ. निलिमा कुलकर्णी, ठाणे म.न.पालिकेचे श्री. रामनानी, जिज्ञासाचे श्री व सौ. दिघे, पत्रकार श्री. श्रीकांत नेर्लेका, आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे महाविद्यालयाच्या सभागृहातील आयोजन करण्याची जबाबदारी उपप्राचार्या डॉ. सौ. माधुरी पेजावर व आर्. पी. आठल्ये आणि त्यांचे सहकारी यांनी पार पाडली होती. पाणी समस्येच्या सर्वांच्या जिव्हाळ्याच्या विषयावर चर्चा सत्र आयोजित करून कृती आराखडा तयार केल्याबद्दल हरियाली व बा.ना.बांदोडकर महाविद्यालय या दोघांना विशेष धन्यवाद द्यावयास हवे.

- प्रा. मोहन पाठक

**प्रोजेक्ट : 'इन्स्टॉलेशन ऑफ टनेल वायरिंग'**



*'इन्स्टॉलेशन ऑफ टनेल वायरिंग' - स्वानंद तरटे*

(T.Y.E.P.S.)

दि. २४ जून २००२ ला कॉलेज चालू झाले. शेवटचे वर्ष असल्याने प्रत्येकाच्या मनात अभ्यासाबरोबर प्रोजेक्टची भीती दिसत होती. काही दिवसातच प्रोजेक्टचे ग्रुप तयार झाले तसा आमचाही ग्रुप तयार झाला. इलेक्ट्रीकलचे विद्यार्थी म्हणून आम्ही Installation चा प्रोजेक्ट घ्यायचा असे ठरविले. काही दिवसातच आम्ही Street Lighting या विषयावर चर्चा केली आणि त्यात काही modification करण्याचे ठरविले. हा विषय आम्ही सौ. एन्.व्ही. वडेर मॅडम (विभाग प्रमुख इलेक्ट्रीकल) यांच्यासमोर मांडला परंतु त्यावर सखोल अभ्यास

केल्यानंतर त्यात काही disadvantages आढळून आले. त्यावेळी मॅडमनी Installation of Road tunnel wiring हा विषय सूचविला आणि त्यासाठी Mumbai-Pune Express Highway वरील एखादा tunnel निवडण्यास सांगितले. अशाप्रकारे हा विषय आम्ही सर्वांनी निवडला.

जून ते नोव्हेंबर या दरम्यान प्रोजेक्ट विषयी पूर्ण माहिती गोळा केली. दरम्यान tunnel ला visit देऊन आम्ही खूप माहिती गोळा केली. या visit साठी आम्हाला Express Highway चे Executive Engineer श्री. जे.जी.महाले यांनी खूपच मदत केली. डिसेंबर महिन्यात आम्ही fabrication ला सुरूवात केली. मॅडमचा अनुभव आणि कल्पना आमच्या पाठीशी होत्या. कोणत्याही अडचणीच्या वेळी त्यांनी आम्हाला सढळ हाताने मदत केली. हा प्रोजेक्ट करताना बरेच काही बरे-वाईट अनुभव आम्हाला आले. परंतु त्याच्यावर आम्ही सहज मात केली. ग्रुपमध्ये काम करण्याचा अनुभव किंवा काम करण्याची मजा वेगळीच असते. कॉलेजमधील शेवटचे वर्ष असूनही आम्ही सर्व खेळावर तसेच कार्यक्रमांवर पाणी सोडले कारण फक्त प्रोजेक्टसाठी आम्ही निवडलेला विषय हा नवीन आहे म्हणून तो सर्वांपर्यंत चांगल्या प्रकारे पोहचावा हीच इच्छा आमच्या मनात होती आणि म्हणूनच आमच्या वर्गातले आमचे काही सहकारी स्वत:हून आम्हाला मदत करायला यायचे. हा एक चांगला अनुभव आम्हाला आला.

या tunnel मधील इलेक्ट्रीक Installation चा आम्ही अभ्यास केला. या मागील मूळ म्हणजे to avoid Black Hole effect हा effect मनुष्याच्या डोळ्यांना जाणवतो. जेव्हा आपण एकदम अंधारातून - उजेडात किंवा उजेडातून अंधारात जातो तेव्हा आपल्या डोळ्यासमोर अंधारी येते त्यालाच Black Hole effect म्हणतात. जर tunnel मध्ये तुम्ही योग्य प्रमाणात Light लावले नसतील तर हा effect चालकाला जाणवू शकतो आणि त्यामुळे अपघाताचे प्रमाण वाढते. आता, हा effect त्यांनी कसा कमी केला? प्रथम त्यांनी तो tunnel तीन विभागात विभागला. पहिल्या विभागात 1500 lux light पुरविला, दुसऱ्या विभागात 100 lux आणि तिसऱ्या विभागात 150 lux light पुरविला. चालक जसा tunnelमध्ये प्रवेश करतो तेव्हा त्याला हा effect जाणवतो म्हणून आपण जास्त lux पुरवून तो effect ८० ते ९०% कमी केला. तो जसा पुढे जातो आहे म्हणजे दुसरा विभाग पार करेपर्यंत त्याचे डोळे हे पूर्णपणे स्थिर झालेले आहेत. तो अजून जसा पुढे जातो म्हणजे तो बाहेर पडतो आहे म्हणून त्याला आजूबाजूचे दिसण्याइतपतच light पुरविला आहे. अशाप्रकारे हा effect कमी करून tunnel मधील अपघातांचे प्रमाण कमी करण्यात आले आहे. या बरोबर त्यांनी tunnel मधील वातावरण स्वच्छ रहावे म्हणून मोठमोठे पंखे लावले आहेत. विविध प्रकारचे sensors लावले आहेत. उदा. smoke detector, co sensor, light sensor, तसेच त्यांनी दूरध्वनीची सोय केली आहे. speaker आणि camera देखील लावला आहे. अपघातग्रस्थांना मदत करण्यासाठी त्यांचे एक पथक सुद्धा आहे.

या प्रोजेक्टमुळे प्रगत तंत्रज्ञानाचा अभ्यास आम्हाला करण्याची संधी मिळाली. हा अतिशय नवीन विषय असल्यामुळे प्रत्येकाने या विषयी माहिती करून घ्यावी आणि या प्रोजेक्टमुळे संधी उपलब्ध झालेली आहे, त्याचा सर्वांनी लाभ घ्यावा.

ग्रुपमधील विद्यार्थ्यांची नावे

**स्वानंद तरटे, दत्तात्रय कुमार, संदिप मासये, मंदार कुलकर्णी, तुषार त्रिंबके, मंजिरी भडंग**

तृतीय वर्ष,
इलेक्ट्रिकल पॉवर सिस्टिम
वि. प्र. मंडळाचे तंत्रनिकेतन

•••